आर्थिक | राजकीय | सामाजिक घडामोडींचा धांडोळा...

६ मार्च २०१२ | वर्ष २८ | अंक २३

# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

₹१०

## लुटारूंनाच वाटते भीती
## शेतकरी करतो अफूची शेती



देशातील उत्तर प्रदेश आणि मध्यप्रदेशातील काही जिल्ह्यांतच अफूच्या लागवडीसाठी परवानगी आहे, तरीही उत्तर भारतामध्ये अफू, गांजा हा सर्रास उपलब्ध होतो. ज्या पद्धतीने शस्त्रास्त्रे म्हणजे तलवारी, गावठी कट्टे हे देशाच्या काही भागांत सहज उपलब्ध होतात, तशीच परिस्थिती या अफू आणि गांजाविषयी आहे. देशातल्या काहीच शेतकऱ्यांना त्याची परवानगी का? असा प्रश्न शेतकरी उपस्थित करू शकतील. अफूचा वापर केवळ नशेसाठी नसून मोठ्या प्रमाणावर औषधी उद्योगातही केला जातो. औषध कंपन्यांनाही तो सहजासहजी उपलब्ध होत नाही. त्यांनाही चोरीमारी आणि काळाबाजार करावा लागतो, हे सर्वज्ञात आहे. अफू आणि गांजा हे नशिले पदार्थ असल्याने त्यांच्या लागवडीबद्दल कुणी समर्थन करो किंवा न करो, परंतु लाखो शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या, शेतकऱ्यांना निव्वळ शेतीवर मुश्किल झालेले जगणे, त्यांना मिळणारा तुटपुंजा वित्तपुरवठा या गोष्टींकडे कित्येक वर्षांपासून अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे, हे तर सर्वांनाच मान्य करावे लागेल.

# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्याचे पाक्षिक

वर्ष २८ । अंक २३ । ६ मार्च २०१२

**मूल्य : ₹ १०**

संपादक
**सुरेशचंद्र म्हात्रे**

कार्यकारी संपादक
**श्रीकांत उमरीकर**

सल्लागार संपादक
**डॉ. मानवेंद्र काचोळे**
**डॉ. गिरधर पाटील**

साहाय्यक संपादक
**ज्ञानेश्वर शेलार**

मुखपृष्ठ/अंक मांडणी
**श्रीकांत झाडे**

**वार्षिक वर्गणी : ₹ २०० केवळ**

**(टीप : वर्गणीदारांनी अंकांसंबंधी तक्रार असल्यास खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.)**
**संपर्क :** कार्यकारी संपादक, पाक्षिक शेतकरी संघटक, जनशक्ती वाचक चळवळ, २४४–समर्थनगर, औरंगाबाद–४३१००१–३१, फोन : ०२४०–२३४१००४. ईमेल : shetkarisanghatak@gmail.com

● हा अंक मालक परदेशी मोहन बिहारीलाल यांच्यासाठी संपादक, मुद्रक, प्रकाशक म्हात्रे सुरेशचंद्र पी., मु.पो. आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे ४१०५०१ यांनी उदय एंटरप्राईजेस, ७० सी, सर्व्हिस इंडस्ट्रीज टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद ४३१००३ येथे छापून जनशक्ती वाचक चळवळ, 'पिनाक', समर्थनगर, औरंगाबाद–४३१००१–३१ येथे प्रकाशित केला. ● अंकाची प्रसिद्धी दर महिन्याच्या ६ व २१ तारखेला. ● अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.




# अंतरंग


आजकाल
**लुटारूंनाच वाटतेय भीती शेतकरी करतोय अफूची शेती**
ज्ञानेश्वर शेलार ........ ३

शरदऋतू
**सरकारला वगळून शेती हाच पर्याय**
शरद जोशी ........ ६

चर्चा
**काँग्रेसची उलटीच खूण**
**गुन्हेगारा थोरपण**
पी. साईनाथ ........ १०

मिरचीचं खळं
**काही घडलंच नाही!**
बाबू सोंगाड्या ........ ११

कॉमन नॉन सेन्स
**कर्तबगारी उद्धवची, प्रकाशझोत राजवर**
सुधाकर जाधव ........ १३

**शेतकरी संघटना वृत्त** ........ १५

**संपादकीय * श्रीकांत उमरीकर**

# शेती अफूची नशा कुणाची?

महाराष्ट्रातील सांगली, कोल्हापूर, बीड, परभणी भागात शेकडो एकरांवर अफूची शेती आढळून आल्याने फार मोठा गहजब झाला, असं चित्र रंगवल्या जात आहे. ज्या पद्धतीने गावोगाव अवैधरीत्या दारूचे गुत्ते चालू असतात आणि अचानक पोलिसांनी धाड टाकली आणि अवैध दारू सापडली अशी बातमी येते, तसं काहीसं या बाबतीत झालं आहे. ही गोष्ट सुरुवातीलाच लक्षात घ्यायला पाहिजे- या प्रकरणात सगळ्यात नालायकपणा सिद्ध होतो तो पोलिस खात्याचा! शेतकरी हे पीक 'खसखशीचं' म्हणून घेत आहेत. आजही बोंडांपासून अफू तयार करण्याचं तंत्र शेतकऱ्याला फारसं अवगत नाही. त्यामुळे अफूची बोंडे खरेदी करणारे व्यापारी त्यापासून विविध मादक पदार्थ तयार करणारे, या व्यापारात अगदी आंतरराष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या तस्करीत सामील असणारे या सगळ्यांवर सगळ्यात पहिल्यांदा गुन्हे दाखल व्हायला पाहिजेत. इतकेच नाही तर कडक कारवाई ताबडतोब केली जायला हवी. हे सगळं सोडून बळी जातो आहे तो सामान्य शेतकऱ्याचा. ज्याला या सगळ्यांतून मिळणारा वाटा अतिशय अल्प आहे. इतर पिकांपेक्षा खसखशीचे हे पीक बरे, कारण त्यातून काहीतरी नगदी रक्कम पदरात पडते.

स्वातंत्र्याच्या ६५ वर्षांनंतर आपण उभारलेल्या व्यवस्थेचा फोलपणा वेळोवेळी उघड पडत चालला आहे. कायदा आणि सुव्यवस्था हे शासनाचे प्रमुख काम असायला हवे; पण हे शासन नोकरदारांचे पगार करण्यात आणि ते नोकरदार हप्ते खाण्यात इतके मग्न आहेत, की त्यांना त्या पलीकडे काहीच दिसत नाही. शिक्षणव्यवस्था इतकी पोकळ झाली आहे. शाळेत नेमकी किती मुलं आहेत. त्यातली खरी किती याची मोजणी होऊनही नेमका आकडा बाहेर सांगायला शासन तयार नाही. त्यांच्यावर कारवाई करणं तर दूरच राहिलं. विविध घोटाळ्यांचे नुसते आकडे वाचले तरी डोकं गरगरायला होतं आहे. मग या घोटाळ्यांना जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई कशी करणार? अफूच्या या भानगडीतून अगदी ग्रामीण पातळीवर जी एक प्रशासकीय यंत्रणा आपण उभारली होती, तिचं पोकळपण परत एकदा स्पष्टपणे सिद्ध झालं आहे.



मधल्या काळात महाराष्ट्र शासनाने महात्मा गांधी तंटामुक्ती अभियान, राष्ट्रसंत गाडगेबाबा स्वच्छता अभियान आदी योजना वाजतगाजत सुरू केल्या होत्या. या योजनांचा अर्थच मुळी हा होता, आम्ही तुमच्यासाठी काहीही करू शकत नाही, तुमचा तुम्ही विकास करून घ्या, तुमचे तुम्ही भांडणं मिटवून घ्या, तुमची तुम्ही स्वच्छता करून घ्या... फार तर आम्ही तुमच्यामध्ये स्पर्धा लावून तुम्हाला पुरस्कार म्हणून थातूरमातूर रक्कम देऊत. म्हणजे जुन्या काळी जो काही भलाबुरा गावगाडा चालला होता- ज्याला अगदी इंग्रजांनीही हात घातला नव्हता, तो गावगाडा आम्ही मोडून टाकला आणि आता ६५ वर्षांनंतर आम्ही हे अप्रत्यक्षरीत्या कबूलच करतो आहोत, गावपातळीपर्यंत प्रशासकीय यंत्रणा राबवण्यात आम्ही पूर्णपणे नालायक ठरलो आहोत.

अफूचा उपयोग भारतामध्ये काय आणि कशापद्धतीने होतो याची चर्चा याच अंकातल्या लेखांमध्ये आम्ही दिलेली आहे, शासनाने या संदर्भात काहीएक स्पष्ट भूमिका घेऊन पारदर्शीपणे नियम तयार करावेत. त्या नियमांचे पालन करण्यास शेतकरी कटीबद्ध आहे. भारतीय समाजाची ही एक मोठी परंपरा आहे, अगदी दुष्काळाच्या काळातही अन्नधान्याची मागणी करत लोकांनी धान्याच्या गोदामासमोर प्राण सोडले, कित्येक लोक भुकेने मेले; पण लोकांनी गोदामं फोडली नाहीत. नैतिकतेची एक चाड सर्वसामान्य भारतीय माणसाला आणि त्यातही विशेषतः शेतकऱ्याला- कुणब्याला नेहमीच राहिली आहे, कारण हा जो गावगाडा आहे, तो आपल्यामुळे चालतो आहे, याचे एक सम्यक भान त्याला नेहमीच होते. गावगाडा नीट चालावा म्हणून प्राणपणाने प्रयत्न, त्या त्या वेळच्या धुरीणांनी केलेलेच होते. गावातून एखादं कुटुंब विस्थापीत होत असेल, कुणाला खायला अन्न नसेल तर त्याची वास्तपुस्त करण्याचे कर्तव्य गावचा पाटील हा नेहमीच दाखवत आला होता. सगळ्या दोषांसगट ही व्यवस्था किमान काही हजार वर्षे टिकली हे लक्षात घ्यायला पाहिजे. या व्यवस्थेतले दोष दूर करून हिला बळकटी आणता आली असती आणि गावगाड्याचा कणा असलेला कुणबी सामर्थ्यवान कसा होईल हे बघितले असते, तर आज जी अनागोंदीची परिस्थिती दिसते ती तशी दिसली नसती. आपली व्यवस्था कुठल्या दिशेनं हाकायची याचे एक उपजत ज्ञान आणि साहजिकच भानही गावगाड्यातल्या धुरीणांना होते. नवीन व्यवस्थेत सरसकटपणे ग्रामीण माणसाला अडाणी ठरवण्यात आलं. त्याच्या ज्ञानाला पूर्णपणे अडगळीत टाकण्यात आलं आणि त्या जागी बिनकामाची ऐतखाऊ अशी पांढरा हत्ती शोभणारी नोकरशाही आम्ही आणून बसवली. ही नोकरशाही हप्ते खाऊन डोळे मिटून घेते आणि मग अचानक शेकडो एकरांमध्ये अफूची शेती सापडली, 'हे कसे काय झाले बुवा!' असे म्हणत आश्चर्य व्यक्त करते. जणू काही एका रात्रीतून शेकडो एकरांमध्ये अफूची झाडे तरारून आली आहेत.

सर्वसामान्य शेतकऱ्यांची परिस्थिती काय आहे, हे सांगणंही मोठं मुश्किल होऊन बसलं आहे. आंध्रप्रदेशमध्ये मोठ्या प्रमाणात तांदूळ पिकला, तांदळाचे भाव पडले, हा तांदूळ खरेदी करायला आणि साठवायला शासनाची क्षमताही नाही आणि मानसिकता तर मुळीच नाही. तोच तांदूळ जरा बरा भाव मिळतो म्हणून महाराष्ट्रात आणावा, तर या शेतकऱ्यांवर कायदा मोडला म्हणून कारवाई करण्यात येते. खसखशीच्या साठी पीक घ्यावं तर त्याला अफू म्हणून शिक्षा होते. परदेशामध्ये साखर विकायला न्यावी तर भाव कोसळलेले असतात, अशी मोठी बिकट परिस्थिती सध्या आलेली आहे. महाराष्ट्रातल्या निवडणुकांतून जनतेने एक फार चांगला संदेश राज्यकर्त्यांना आणि विरोध पक्षांनासुद्धा दिला होता. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि सिंधुदूर्ग व लातूर जिल्हा परिषद वगळता कुठेच कुठल्याही एका पक्षाला काठावरचं का होईना; पण बहुमत जनतेने दिलेलं नाही. यातून काही एक शहाणपणाचा बोध राजकीय पक्षांनी घ्यावा अशी अपेक्षा आहे; पण ते घेतील याची शक्यता कमी आहे. शेतकऱ्यानं पिकवलेल्या खसखशीच्या पिकातून त्याला काय मिळालं हे सोडून द्या; पण आमच्या व्यवस्थेला मात्र एकूणच फार मोठी गुंगी आली आहे, असं दिसतं आहे.

# लुटारूंनाच वाटतेय भीती शेतकरी करतोय अफूची शेती

कापसाचा भाव ७ हजारांवर गेला तर कापसावर निर्यातबंदी लावली जाते. कापूस जर बेभाव झाला तर शासन शेतकऱ्यांकडे ढुंकूनही बघत नाही. शासनाने शेतकऱ्यांना अक्षरशः वाऱ्यावर सोडले आहे. शासनाच्या या शेतकरीविरोधी धोरणाला कंटाळून आंध्रप्रदेशातील शेतकऱ्यांनी आपली लाखो एकर जमीन पडीत ठेवली आहे. कृषीमूल्य आयोगाचे अध्यक्ष डॉ. अशोक गुलाटी यांनी तर शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव देणे अशक्य आहे, असे जाहीर केले आहे. यावर देशातील राजकारणी तर सोडाच; पण विचारवंतही गप्प बसून आहेत. असा आरोपही शेतकरी संघटनेने आपल्या निवेदनात केला आहे. शेतकऱ्यांनी गांजाची व अफूची शेती करून कुठलाही घोटाळा केलेला नाही. कोठे काळा पैसा दडवलेला नाही, कुणाला फसवलेले नाही, तर केवळ पीक परवडत नाहीत म्हणून अफूची शेती केली असे उघड उघड समर्थन शेतकरी संघटनेने केले आहे.



ज्ञानेश्वर शेलार

बीड आणि परभणी जिल्ह्यात शेकडो एकर अफूची लागवड करण्यात आल्याची माहिती उघड झाली आहे. या अफूची किंमत काही कोटी रुपये असल्याचा अंदाज महसूल विभागाने व्यक्त केला आहे. अद्यापपर्यंत चाळीस शेतकऱ्यांवर कारवाई करण्यात आली आणि त्यातील दहा जणांना अटक करण्यात आली आहे. अजूनही काही ठिकाणी अफूची शेती केली जात असल्याचा अंदाज पोलिस यंत्रणेने व महसूल विभागाने व्यक्त केला आहे. नार्को टेस्ट कंट्रोल ब्युरोच्या अधिकाऱ्याने नमूने गोळा करून प्रयोगशाळेत तपासणी सुरू केली आहे. नशा आणणाऱ्या अमली पदार्थांचे उत्पादन करणे व जवळ बाळगणे कायद्याने गुन्हा असल्याचे स्पष्ट करून तशी कलमे शेतकऱ्यांवर लावण्यात आली आहेत.

उत्तर प्रदेश व आंध्र प्रदेशमध्ये ठराविक जिल्ह्यांत अफू उत्पादनाला परवानगी आहे. बाकी इतर ठिकाणी सर्व देशभर या उत्पादनाला प्रतिबंध आहे. परभणी व बीड जिल्ह्यात हरियाणा व पंजाबचे व्यापारी अफूची बोंडे खरेदी करण्यासाठी येत असत व १२०० ते १४०० रुपये दराने ही खरेदी चालत असावी, असे पोलिस यंत्रणेने म्हटले आहे. अफूची शेती हीच खसखसची शेतीही आहे. बोंडातील खसखस काढून घेतल्यानंतर उरलेली बोंडे दीर्घ काळ भिजवून निघालेला अर्क शिजवून त्यापासून अफू बनवली जाते. तसेच शेतात उभ्या पिकाला आलेल्या बोंडांना बारीक चिरा देऊन त्यापासून निघालेल्या चिकापासून विविध प्रकारची मादक द्रव्ये तयार केली जातात. त्यांचा भाव काही कोटी रुपये किलो असल्याचे सांगितले जाते. शेतकऱ्यांनी मात्र आम्ही अफूची नव्हे तर खसखसची शेती करीत होतो असे सांगितले आहे.

या संपूर्ण घटनाक्रमाने राज्यभर खळबळ उडवून दिली आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात अफूची शेती केली जात असताना महसूल विभागातील तसेच पोलिस यंत्रणेतील कोणालाच याची खबर कशी नव्हती? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. खरेदी विक्रीचे व्यवहार येथील कोणत्याच सरकारी यंत्रणेच्या कसे नजरेत आले नाहीत. महसूल यंत्रणा पिकाच्या नोंदी करते. त्यांच्याही कसे नजरेत आले नाही? असे अनेक खळबळजनक प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत.

शेतकरी संघटनेने यात आणखी मोठी खळबळ उडवून दिली आहे. परभणी जिल्ह्यातील शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य भाव मिळत नसल्यामुळे राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र सुरू आहे. शेतकऱ्यांनी कोणताही बँक घोटाळा केलेला नाही किंवा कोणाला आमीष दाखवूनही फसवलेले नाही. पीक परवडत नाही म्हणून बीड व परभणी जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी अफू, गांजाची लागवड केल्याचा प्रकार घडला आहे, असे निवेदन प्रसिद्धीस दिले आहे. या निवेदनामुळे राज्यभर खळबळ उडाली आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर शेतकरी संघटनेने वारंवार आंदोलने केली. जवळपास ३० वर्षांपूर्वी शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव द्या अशी मागणी केली. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीमालाच्या भावाचा प्रश्न सुटणार होता; परंतु शासनाला शेतकऱ्याचे नाव फक्त निवडणुका आल्यावरच घेता येते, शासनाने या महत्त्वाच्या मागणीकडे नेहमीच दुर्लक्ष केले आहे. या कारणानेच शेतकरी देशोधडीला लागला आहे आणि मोठ्या प्रमाणावर आत्महत्या करीत आहे. कापसाचा भाव सात हजारांवरून तीन हजार पाचशेंवर येत आहे. तुरीचा भाव ६ हजारांवरून २ हजार पाचशेंवर आला आहे. तर हळदीचा भाव २५ हजारांहून फक्त ३ हजारांवर येऊन ठेपला आहे आणि असे नेहमीच शेतीमालाच्या बाबतीत घडत आहे. त्यामुळे शेतकरी जगणार तरी कसा? असा प्रश्न शेतकरी संघटनेने निवेदनात उपस्थित केला आहे. कापसाचा भाव ७ हजारांवर गेला तर कापसावर निर्यातबंदी लावली जाते. कापूस जर बेभाव झाला तर शासन शेतकऱ्यांकडे ढुंकूनही बघत नाही. शासनाने शेतकऱ्यांना अक्षरशः वाऱ्यावर सोडले आहे. शासनाच्या या शेतकरीविरोधी धोरणाला कंटाळून आंध्रप्रदेशातील शेतकऱ्यांनी आपली लाखो एकर जमीन पडीत ठेवली आहे. कृषीमूल्य आयोगाचे अध्यक्ष डॉ. अशोक गुलाटी यांनी तर शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव देणे अशक्य आहे, असे जाहीर केले आहे. यावर देशातील राजकारणी तर सोडाच; पण विचारवंतही गप्प बसून आहेत. असा आरोपही शेतकरी संघटनेने आपल्या निवेदनात केला आहे. शेतकऱ्यांनी गांजाची व अफूची शेती करून कुठलाही घोटाळा केलेला नाही. कोठे काळा पैसा दडवलेला नाही, कुणाला फसवलेले नाही, तर केवळ पीक परवडत नाहीत म्हणून अफूची शेती केली असे उघड उघड समर्थन केले आहे.



कांदा या पिकास आंतरपीक म्हणून खसखस हे पिक घेतलं जाण्याची महाराष्ट्रातील काही भागांमध्ये प्रथा आहे. सुरुवातीला कांद्याच्या तरुमध्ये आंतरपिक म्हणून घेतलं जाणाऱ्या या खसखशीच्या रोपांना, अफूचा जोडधंदा मिळताच कांद्याच्या बागांवरच संक्रात आली आणि शेकडो एकरवर दिसू लागली ती फक्त अफूची शेती. अफूची शेती कायद्याच्या दृष्टीने प्रतिंबधीत असली तरी फासावर आपलं आयुष्य संपवणाऱ्या शेतकऱ्याना खसखसीचे हे पिक वरदान ठरतय.

अफूचे शास्त्रीय नाव पॅपेव्हर सोम्निफेरम असे आहे. या वनस्पतीपासून अफू हा एक मादक विषारी पदार्थ मिळतो. तो अफूच्या कच्च्या फळांना चिरा पाडून मिळवला जातो. चिरा पाडल्यावर फळातून रस पाझरतो आणि हा रस वाळवून घट्ट केला की अफू हा मादक पदार्थ मिळतो. या अफूची लागवड प्राचीन काळापासून होत आली आहे. अफूचे झुडूप मुळचे पश्चिम अशियातील असून अरबांकडून ते चीनमार्गे आता थेट बीड-सांगलीपर्यंत जावून पोहोचलयं.

अफू हे ६० ते १२० सेंमी. उंचीचे झुडूप आहे. याची पाने साधी, कमी जास्त करवती काठाची असतात. बिया लहान, पांढऱ्या व विपूल असून त्यांनाच खसखस म्हणतात. खसखशीचा वापर करण्यासाठीच केवळ हे पिक घेतात असा जरी दावा नसला तरी शेतकऱ्यांच्या आत्महत्येचं प्रमाण सतत वाढवणाऱ्या याच महाराष्ट्रात, अफू लागवडीमुळे शेतकऱ्याना चार पैसे मिळू लागलेयत हे वास्तव आहे.. कृषीप्रधान महाराष्ट्रात आंतरपिकावर वक्रदृष्टी ठेवण्याची भूमिका नेहमीच शेतकऱ्यांना संकटात टाकतेय..

विदेशातल्या या पिकानं महाराष्ट्राच्या देशी मातीतही आपली पाळेमुळे घट्ट रोवलीय. अफू हे पिक सुरुवातीस खसखससाठी, कांद्याचे तरु, मका आणि ऊस यामध्ये आंतरपिक म्हणून घेतले जात होते. डिसेंबर आणि जानेवारीत मुख्य पिकांबरोबरच अफूची लागवड करण्यात येते. साधारण दीड महिन्यानंतर याला गुलाबी पांढऱ्या रंगाची फुले येतात. यातली टिचभर खसखस काढून घेतली कि, शेतकऱ्याना मिळतोय अफाट फायदा.. आणि अफूचा हाच फायदा गैर कि योग्य हा अनुत्तरीत सवाल महाराष्ट्रात वादळ निर्माण करतोय.

कॅश-क्रॉप म्हणून ओळखलं जाणाऱ्या अफूला आता महाराष्ट्राचं शिवार मिळतय.. यापासून शेतकऱ्याना फायदा होत असला तरी गृहखात्याच्या ते अडचणीचं ठरणार आहे. कारण याच अफूच्या पीकातून मिळणाऱ्या हेरॉईनचा बक्कळ पैशांतून

शेतकरी संघटनेने केवळ अफूची शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचेच समर्थन केलेले नाही, तर आंध्र प्रदेशातील शेतकऱ्यांनी तांदूळावरील राज्यबंदी झुगारून महाराष्ट्रात आलेल्या एक हजार पेक्षा जास्त शेतकऱ्यांचे आंध्र-महाराष्ट्र सीमेवरील येसगी येथे स्वागत केले आहे. हे स्वागत करून तांदळावरील राज्यबंदी उघडउघड झुगारून दिली आहे. आंध्रप्रदेशात तांदळाचे मोठ्या प्रमाणात पीक येते; पण त्याला तेथे भाव नाही. सरकारने तांदळाला राज्यबंदी लावल्याने हा तांदूळ इतर राज्यांमध्ये विकता येत नाही. हा शेतकरी विरोधी कायदा तात्काळ रद्द करावा, अशी आंध्रच्या शेतकऱ्यांची मागणी आहे. ती मान्य होत नसल्याने एक हजारपेक्षा अधिक बैलगाड्यांनी हा तांदूळ महाराष्ट्रात आणण्यात आला. सीमेवर या शेतकऱ्यांचे शेतकरी संघटनेने व स्वतंत्र भारत पक्षाने वाजत गाजत स्वागत केले.

१९९२ ते ९७च्या दरम्यान अशाच प्रकारे शेतकरी संघटनेने कापसाला राज्यबंदी असताना शेकडो बैलगाड्या, ट्रॅक्टर्स, ट्रक्स या मध्यप्रदेश-महाराष्ट्र सीमेवरून वाजत गाजत नेऊन सैंधवा येथे कापूस विक्रीसाठी नेला. आंध्रप्रदेश, गुजरात या राज्यांमध्ये कापसाला चांगला भाव मिळत असे, त्याच वेळी महाराष्ट्रात कापूस एकाधिकारामुळे शेतकऱ्यांना आपला कापूस फक्त फेडरेशनलाच विकावा लागत असे. त्या मानाने वरील दोन्ही राज्यांत कापसाचा बरा भाव असल्याने शेतकरी आपला कापूस गुजरात आणि मध्यप्रदेशमध्ये घेऊन जात परंतु त्यांना सीमेवर अडवले जाई किंवा मोठ्या प्रमाणावर पोलिसांना चिरीमिरी दिल्यावर त्यांची कशीबशी सुटका होत असे, आज ज्या पद्धतीने आंध्रच्या शेतकऱ्यांनी तांदळावरील राज्यबंदी झुगारली, त्याच पद्धतीने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी त्यावेळेस वाजतगाजत आपला कापूस परराज्यात नेऊन विकला. सध्या कापसाला राज्यबंदी नसली, तरी निर्यातबंदीची चाबी मात्र केंद्र सरकारने आपल्या हातात ठेवली आहे.

याच काळात आणि नंतरही शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते आम्हाला जागतिकीकरणाचे आणि खुलीकरणाचे फायदे मिळायला हवेत, फक्त शेतीमालावरच झोनबंदी, राज्यबंदी, निर्यातबंदी, आयातबंदी अशा दंडबेड्या का? आम्हीच काय गुन्हा केला? आम्ही शंभर दाण्याचे हजार दाणे करतो. देशाला खाऊ घालतो, तरीही आमच्यावरच बंदी का? या काळात शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते वेगवेगळ्या सभांमध्ये भाषण करताना आम्ही दिवसा सरकी आणली, दिवसा टोकली, दिवसा खत दिले, दिवसा पाणी दिले (सध्या भारनियमन असल्याने शेतकऱ्यांना रात्री पाणी द्यावे लागते. सरकारनेच त्यांना हा व्यवसाय चोरासारखा करण्याचे बंधन टाकले आहे.) दिवसा निंदणी, खुरपणी केली, दिवसा कापूस वेचला आणि दिवसाच विकायला नेत आहोत, तरीही आमच्यावर चोरासारखी बंधने का? आम्ही कापूस उत्पादक आहोत चोर नाहीत! आमच्यावर वेगवेगळ्या कलमांखाली केसेस केल्या जातात. गाड्या पोलिस स्टेशनमध्ये उभ्या केल्या जातात. अटक होते. पोलिस गांजाच्या आणि अफूच्या ट्रक सोडून देतात आणि कापसाच्या ट्रक आणि बैलगाड्या मात्र अडवतात असा प्रश्न सभेमध्ये उपस्थित करीत असत. आता मात्र खरोखरच सरकारवर गांजाचे आणि अफूची झाडे उपटण्याचे आणि त्यांच्या गाड्या अडवण्याचे काम येऊन पडले आहे.

आता ज्या पद्धतीने शेतात जाऊन सरकारी यंत्रणा गांजाची आणि अफूची झाडे उपटीत आहेत, त्याच पद्धतीनी बीटी कॉटन जेव्हा गुजरातमधील शेतकऱ्यांनी शेतात लावले, महसूल यंत्रणेच्या निदर्शनास कापसाची काही शेते अधिक हिरवी बोंडाची संख्या अधिक आणि झाडे निरोगी आहेत, असे लक्षात आले तेव्हा पोलिसांना शेतात पाठवून बीटी कॉटनची झाडे उपटण्यात आली.

चालणार अफूमाफियांनी आता अवघ्या जगालाचं विळखा घातलाय.

खसखशीच्या पीकातून अफू.. अफूतून हेरॉईन आणि हेरॉईनमधून प्रचंड पैसा या सूत्रातून अफूच्या उत्पादनातून प्रचंड पैसा ओढला जातोय. अफू आज या शब्दानं महाराष्ट्राच्या गृहखात्याच्या कर्तव्यदक्षतेची धुंदीही खडकन उतरवलीय.. एवढ्या मोठ्या प्रमाणात अफूचे पिक सापडल्यानं आता अफूचा पीक नेमंक का घेतलं जातय? त्यापासून नेमका शेतकऱ्याना काय फायदा मिळतोय या प्रश्नाची उत्तर शोधली जातायतं..

अफू हा पदार्थ वैद्यकीयदृष्ट्या उपयुक्त असलेल्या अल्कालॉइडांसाठी प्रसिद्ध आहे. फळांपासून मिळणारी अफू चवीला कडू, स्तंभक, मादक, वेदनाहारक असून ती बध्दकोष्ठता नष्ट करते. तसंच अनेक विकारांवर ती उपयुक्त ठरते. तिच्या बिया पौष्टीक असतात. याच खशखशीपासून तेल काढतात. तर खाद्यपदार्थांमध्येही खसखस वापरतात. अफूचा मादकपणा खशखशीमध्ये नसतो.

खसखशीचे तेल खाण्यासाठी आणि विषेशकरून चित्रकारांचे रंग व साबण तयार करण्यासाठी वापरतात. नशेसाठी अफूचे सेवन प्राचीन काळापासून प्रचलित आहे. तिच्यामधील अल्कलॉईडचे सेवन करून, धुरावाटे किंवा तिचा अर्क शरीरात टोचून वापरली जातात. नशेसाठी अफू सेवन केलेल्या व्यक्तीला पुनः पुन्हा सेवनाची इच्छा होउन ती व्यक्ती व्यसनात कायमची गुरफटली जाते. जगातील बहुसंख्य राष्ट्रांत अफुचे सेवन आणि निर्मिती बेकायदा ठरवली आहे.

अफूचं पीक घ्याव की, खसखशीच्या आंतरपीकावरचं मर्यादीत राहावं हा मुद्दा आता कळीचा ठरतोय.. सातबारावर नोंद उस कांदा अशी असेल तर मग अफूची शेती प्रत्यक्षात कशी कशी हा सवाल अंतर्मुख करुन जातोय.

शेतकरी नेत्याचा हा सवाल कृषीप्रधान महाराष्ट्रातल्या बळीराजाच्या सद्यस्थितीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित करतोय.. नव्या तंत्रज्ञानाला प्रवृत्त होत आणि विक्रमी उत्पादनही घेतो मात्र हाच माल बाजारात आणला की मग शेतकऱ्याला अत्यल्प दर देउन शेतकऱ्याला उध्वस्त केलं जातं. शेतकऱ्यांच्या मालाला भाव देण हे सहजा सहजी शक्य नसल्याची ही हतबलता कृषीमंत्र्यानीही बोलून दाखवलीय..शेतकऱ्यांना आधार देणार कृषी मुल्य आयोगाकडेही ह्याच उत्तर नाही हे विशेष..

बीड- सांगली जिल्ह्यातील ज्या शेतकऱ्यांकडे खसखस पिकली ते उसतोड मजूर आहेतएकरी आंतरपीक म्हणून घेण्यात येणाऱ्या या पीकाचं उत्पादन ५ क्विंटल पर्यंत येतं. किलोला ५ रुपये भाव मिळत असल्याने शेतकऱ्याला एकरी फक्त २५ हजार रुपयांपर्यंत उत्पन्न मिळतं.. मात्र हिच खसखस ग्राहकांपर्यंत पुढे १०० रुपये किलोने विकली जाते गहू, मका अशा पिकांच्या तुलनेत खसखशीला खत, आंतरमशागत आणि औषधांचा अतिरिक्त खर्च येत नाही.. त्यामुळे खेळतं भांडवल मिळावं या हेतुने शेतकरी ही पीक घेतात...

खसखस पिकवणं कायद्यानं गुन्हा नसला तरी अफुसाठी तोच शेतकरी गुन्हेगार ठरतो. सर्वच पिकांचे हमीभाव पडत असताना शेतकऱ्यांनी हा खसखशीचा मार्ग स्वीकारला..अगोदर कापूस,मग कांदा, त्यानंतर उस,तसेच वीज, आणि आता अफू परिषद ही आंदोलनाची साखळी वाढत चाललीय. बळीराजाचा महाराष्ट्र असं म्हणताना आज शेतकरी अफू पिकवताना कायद्याचा गुन्हेगार असेलही, पण हा गुन्हा तो का करतोय त्याच्या समोर सामाजिक परिस्थीतीची कारण वेळीच शोधणं गरजेचं बनलय.

*(दि. २१ फेब्रु. २०१२ झी २४ तास डॉट कॉम या वेबसाईटवरील 'अफूचे रफूचक्कर' या लेखातून साभार.)*

शेतकरी संघटनेने यावेळी मोठे आंदोलन उभारून या सर्व शेतकऱ्यांना पाठिंबा दिला व आम्हाला तंत्रज्ञानाचे स्वातंत्र्य मिळायला हवे, असे सांगून पोलिसांना शेतातून पिटाळून लावले. बीटी कॉटन शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त आहे. तरीही त्याला पर्यावरण प्रदुषणाच्या नावाखाली सात वर्षे देशात येऊ दिले नाही. हे बियाणे चोरून आणण्यात आले व मोठ्या लढाईनंतर त्याला परवागनी देण्यात आली. आता तर शेतकरी स्वतःच रांगा लावून बीटीची खरेदी करतात? ज्या पद्धतीने आज शेतात जाऊन गांजाची आणि अफूची झाडे उपटून टाकली जात आहेत. तसाच उद्दामपणा सरकारने कापसाच्या बाबतीतही एकेकाळी केलेला आहे. तंत्रज्ञानाला जर तुम्ही उघडउघड येऊ दिले नाही, तर ते चोरीच्या मार्गाने येईल. तंत्रज्ञान मुक्त असावे. लोकांना योग्य वाटले तर ते घेतील किंवा नाकारतील एवढा साधा विवेकही त्या काळी सरकारने ठेवला नाही. आज खरोखरच गांजाची आणि अफूची झाडे उपटून टाकण्याची नामुष्की त्यांच्यावर आली आहे.

देशातील उत्तर प्रदेश आणि मध्यप्रदेशातील काही जिल्ह्यांतच अफूच्या लागवडीसाठी परवागनी आहे तरीही उत्तर भारतामध्ये अफू, गांजा हा सर्रास उपलब्ध होतो. ज्या पद्धतीने शस्त्रास्त्रे म्हणजे तलवारी, गावठी कट्टे हे देशाच्या काही भागांत सहज उपलब्ध होतात, तशीच परिस्थिती या अफू आणि गांजाविषयी आहे. देशातल्या काहीच शेतकऱ्यांना त्याची परवानगी का? असा प्रश्न शेतकरी उपस्थित करू शकतील? अफूचा वापर केवळ नशेसाठी नसून मोठ्या प्रमाणावर औषधी उद्योगातही केला जातो. औषध कंपन्यांनाही तो सहजासहजी उपलब्ध होत नाही. त्यांनाही त्यासाठी चोरीमारी आणि काळाबाजार करावा लागतो, हे सर्वज्ञात आहे.

आताच्या घडलेल्या घटना या काही आकस्मित घडलेल्या नाहीत. अशा प्रकारची लागवड ही बऱ्याच कालावधीपासून चालू होती. नुकत्याच झालेल्या पंचायत समिती व जिल्हा परिषदांच्या निवडणुकीतील स्पर्धा आणि वादातून हे सर्व उघड झाले आहे. अशीही राज्यभर वदंता आहे. अर्थात अफूची शेती उघड होण्यामागे राजकारण आहे, असे म्हटले जात आहे. राजकारणी लोकांनी अगोदरच मोठ्या प्रमाणावर आपापली क्षेत्रे वाटून घेतली आहेत. कुणी सहकारी बँका, सहकारी साखर कारखाने, सुत गिरण्या किंवा शिक्षणसंस्था काढून सरकारी पैशांवर डल्ला मारण्याचे काम तीन तीन पिढ्या चालू ठेवले आहे. एवढेच नव्हे तर या उद्योगातून सहकार महर्षी, शिक्षण महर्षी अशा उपाधीही मिळवल्या आहेत. एवढे जमले नाही तर, सरकारी रस्त्यांची कंत्राटे, टोलनाक्यांचे लिलाव, वाळूचे टेंडर यातूनही मोठ्या प्रमाणावर गबर होता येते हे सर्वश्रुत झाले आहे. केवळ शेतीवर कुणी पोटभरू शकेल किंवा चार पैसे गाठीला ठेवून आपला प्रपंच सुखाने करेन अशी आता शक्यता नाही. राजकारणी लोकांनी वरची एवढी क्षेत्रे वाटून घेतली आहेत. त्यांच्याही आता बँका बुडणे, नियमबाह्य नोकरभरती, नियमबाह्य कर्जवाटप, कारखान्यांची विक्री अशा अनेक भानगडी सुरू झाल्या आहेत. अफू आणि गांजा हे नशिले पदार्थ असल्याने त्यांच्या लागवडीबद्दल कुणी समर्थन करो किंवा न करो; परंतु लाखो शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या शेतकऱ्यांना निव्वळ शेतीवर मुश्किल झालेले जगणे त्यांना मिळणारा तुटपुंजा वित्तपुरवठा या गोष्टींकडे कित्येक वर्षांपासून अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे. हे तर सर्वांनाच मान्य करावे लागेल.

**ज्ञानेश्वर शेलार**
मो. ९२२६७९७०१८

■■

# सरकारला वगळून शेती हाच पर्याय

*सध्या आंध्रप्रदेशात तांदळाचे भाव कोसळले असून धान उत्पादक शेतकरी संकटात सापडला आहे. आंध्रप्रदेश सरकारने लादलेली राज्यबंदी मोडून तेथील शेतकऱ्यांनी नुकतीच मोठी हिंमत दाखवली. या निमित्ताने धान प्रश्नासंबंधी मा. शरद जोशी यांचे दिनांक १७ जानेवारी २००१ रोजी रामटेक, जि. नागपूर येथील 'धान (भात) परिषदे'च्या प्रतिनिधी सत्र आणि खुल्या सत्रातील भाषणांवरून केलेले संकलन.*



शरद जोशी

जन्मभर तुमच्या धानाला भाव मिळावा, तुमच्या मुलांनी पिकवलेल्या धानाला भाव मिळावा, नातवांनीही पिकविलेल्या धानाला भाव मिळावा अशी जर तुमची अपेक्षा असेल तर तुम्हाला यंदा नाही तरी या आयुष्यामध्ये, या पिढीमध्ये एकदोनदा तरी माझे ऐकायला लागेल आणि आंध्रातल्या शेतकऱ्यांनी जसे ठरवले की तंबाखूला जर इतका कमी भाव मिळत असेल तर आम्ही एकदोन वर्ष तंबाखू पिकवतच नाही, तसे तुम्हाला धान्याच्या बाबतीत करावे लागेल. नोकरदारांचे पाहा. ते जे मागतात ते मिळते. कारण, देत नाही म्हटले तर ते लगेच संपावर जातात. एखाद्दुसऱ्या वर्षी घरात वापरायला लागतात तेवढी धानाची पोती बाजूला ठेवा आणि नवीन धान पिकवायचेच नाही असे ठरवा. घरात धानाची पोती ठेवली आहेत त्यावर वर्षभर गुजराण सहज होऊ शकेल अशी तयारी ठेवली तरच या लढाईत जिंकायची शक्यता आहे.

शेतकरी संघटनेची सुरुवात झाल्याला २५ वर्षे लवकरच पुरी होतील आणि आज या धानउत्पादक शेतकऱ्यांसमोर बोलताना मला वाटायला लागले आहे की संघटनेच्या सुरुवातीच्या दिवसात जे वातावरण तयार झाले होते ते पुन्हा एकदा येथे तयार होते आहे.

या परिषदेच्या निमित्ताने सर्व कार्यकर्ते जिल्ह्याजिल्ह्यांत, गावागावांत फिरत होते. त्यांच्यापैकी अनेकांना एक प्रश्न हटकून विचारण्यात आला की, 'शेतकरी संघटनेला आताच कुठे धान-शेतकऱ्यांची आठवण आली? इतके दिवस शरद जोशी कोठे गेले होते?'

हा प्रश्न महाराष्ट्रातील अत्यंत लोकप्रिय प्रश्न आहे. येवला-लासलगाव येथे कांद्याचे भाव पडले की मान्यवर वृत्तपत्रांचे संपादकसुद्धा संपादकीयात लिहितात, 'कांद्याचे भाव पडले, शेतकऱ्यांच्या डोळ्याला पाणी आले, आता शरद जोशी कोठे आहेत? शेतकरी संघटना काय करते आहे?' म्हणजे जणू काही, कांद्याचे भाव पडले म्हणजे काहीतरी केलेच पाहिजे आणि तेही शरद जोशींनीच केले पाहिजे, दुसऱ्या कोणी केलेले चालणार नाही! शेतकऱ्यांनी अशी अपेक्षा व्यक्त केली तर ती प्रेमाची असेल; पण कांद्याचे भाव वाढू लागले आणि पंचतारांकित ग्रहकांच्या डोळ्याला पाणी आले म्हणून शेतकऱ्यांच्या नावाने 'टाटा-बिर्ला' अशी भाषा वापरणारांनी असे प्रश्न विचारले तर त्यात खोडसाळपणाखेरीज आणखी काय असणार?

धानाच्या बाबतीत मी उशीर केला असे ऐकायला आले तरी मला फार वाईट वाटते. मी आंदोलने अनेक केली. उसाचे आंदोलन खूप मोठे झाले, जगभर गाजले पण माझ्या शेतामध्ये उसाचे एक कांडूकही पिकत नाही. कापसाच्या आंदोलनात मी चौदा वेळा तुरुंगात गेलो पण माझ्या वावरात वातीइतकाहीसुद्धा कापूस पिकत नाही. मी आंबेठाणचा शेतकरी, म्हणजे मावळातला. मावळाचा भाग पहिल्यापासून प्रसिद्ध आहे तो वरी, नागली आणि भात पिकविण्याकरिता. माझ्या शेतामध्ये भाताच्या पाच वावरांपैकी एक वावर असे आहे की त्या वावरातील आंबेमोहोर धानाच्या सुगंधाने या वावरात वाघीण येऊन बसे अशी जुन्या काळची आख्यायिका वृद्ध शेतकरी सांगतात. मावळाच्या भामनहर खोऱ्यातील शेतकरी अजूनही सांगतात की आमच्या भागात जो तांदूळ पिकतो त्यात स्निग्धांश इतका की त्याच्या पेजेमध्ये वात लावली तर ती तेवत राहते. इतक्या महत्त्वाचा भात पिकविणारा मी शेतकरी आहे.

मी कांद्याचे आंदोलन केले, उसाचे केले, कापसाचे केले, तंबाखूचे केले, अगदी पंजाबमध्ये जाऊन गव्हाचे आंदोलन केले आणि धानाकडे लक्ष दिले नाही असे होणे शक्य आहे का? या धान परिषदेच्या निमित्ताने मी सांगू इच्छितो की शेतकरी संघटनेच्या संभवाच्या काळात मावळातील खोऱ्यांमध्ये फिरताना, गावागावांमध्ये जाऊन पिंपळाच्याखाली पारावर, देवळांच्या ओट्यांवर बसून शेतकऱ्यांची बोलताना प्रामुख्याने जी चर्चा व्हायची ती धान शेतकऱ्यांच्या हलाखीबद्दल. त्यावेळी आतासारखी माणसे जात नसत; कोणी बोलावणेही धाडत नसे. आपणच बळेबळे जायचे; पारावर, ओट्यावर बसायचे, शेतकऱ्यांना हाका मारून बोलवायचे आणि पाचदहा लोक जमा झाले की त्यांना प्रश्न विचारून बोलते करायचे; अशी चर्चा होत असे.

त्या चर्चांमध्ये माझ्या लक्षात आले की सगळ्याच शेतकऱ्यांना दुःख आहे, सुखी शेतकरी अशी गोष्ट हिंदुस्थानात तरी आस्तत्वात नाही; पण त्यातल्या त्यात सर्वांत जास्त दुःख धान उत्पादक शेतकऱ्यांचे आहे. कारण, धानाची शेती मुळात कष्टदायक. घोटाघोटा पाण्यामध्ये उभे राहायचे ‐ रोपे लावण्यापासून ते बेणणीकापणीपर्यंत ‐ आणि त्या चिखलामध्ये असलेला एखादा जुना मुरलेला काटा भिजलेल्या पायात रुतला म्हणजे काय जाणीव होते ती उसाच्या शेतकऱ्यांना कधी कळायची नाही. इतके सोसूनसुद्धा धान शेतकरीच सगळ्यात दरिद्री राहतो. त्यावेळी मी निश्चय केला की एक दिवस धानाचा शेतकरीसुद्धा हिंदुस्थानात सुखाने आणि सन्मानाने जगू लागेल यासाठी आयुष्यभर झटेन. हा निश्चय त्यावेळी केला, तो पुरा करण्याच्या कामाची सुरुवात आज होते आहे ‐ रामटेकला जमलेल्या या धानउत्पादकांच्या मदतीने आणि साक्षीने.

इतके दिवस हे काम का सुरू झाले नाही? आंदोलन करायचे झाले तर काय लागते? पहिली गोष्ट लोकांचा पाठिंबा. आज पहिल्यांदा इतक्या संख्येने धानाचा शेतकरी फक्त धानाच्या प्रश्नासाठी एकत्र झाले आहेत. आपण सर्वांनी ठरवले की आंदोलन करून धानाला भाव मिळवायचाच तर सरकार फार फार तर तुम्हाला आणि मला उचलून तुरुंगात टाकील. त्यातही अडचण काहीच नाही. तुरुंगात फक्त पहिल्यांदा जाताना भीती वाटेल. एकदा तुरुंगात गेले की आपल्या महिला आघाडीच्या बायासुद्धा म्हणतात, 'तुरुंगात,

माहेरीसुद्धा जगायला मिळत नाही इतकं चांगलं जगायला मिळतं. माहेरी गेलं तर भावजयीच्या धाकानं म्हणा ममतेमुळे म्हणा, थोडी भाजीतरी निवडायला लागते, एखाददुसरं काम करायला लागतं. तुरुंगात तसं काही नाही. सकाळी उठल्या उठल्या चहा येतो, पेज येते, दुपारी भाकरी येते. आपल्या घरी आपण थोडंच पंचपक्वान्नं खातो? आपणही भाकरीच खातो. तेव्हा तुरुंगाला काय भ्यायचं.' तेव्हा आतासुद्धा जर का आपण ठरवले की धानाला भाव भेटेपर्यंत आंदोलन करायचे, तोपर्यंत घरी परतायचे नाही तर तुम्हा सर्वांना ठेवण्याइतके तुरुंग शासनाकडे नाहीत. हे मी शेतकरी संघटनेच्या सुरुवातीच्या काळात बोलत होतो आणि आजही बोलत आहे. फरक एवढाच आहे की त्यावेळी मी फक्त शेतकरी होतो, फारतर शेतकरी संघटनेचा नेता होतो; आज पंतप्रधानांच्या निमंत्रणावरून दिल्लीला मंत्रिपदाची जागा घेतलेला मी सांगतो आहे की धानाच्या भावाकरिता, गरज पडली तर तुमच्याबरोबर तुरुंगात यायला तयार आहे.

पण नुसते तुरुंगात जाण्यानेही काही काम होईल असे नाही. कारण पुढारी आणि प्रशासन हल्ली इतके कोडगे झाले आहेत की तुम्ही तुरुंगात जातो म्हणालात तर म्हणतील, 'जा, जाऊन बसा.' त्यांना हलवण्यासाठी असा कुठेतरी चिमटा काढावा लागतो की त्यामुळे त्यांचे आसन हलायला लागेल. तेव्हा धान शेतकऱ्यांचे आंदोलन करायचे म्हटले तर बाजारामध्ये धान जाता कामा नये, लोकांच्या ताटामध्ये भात पडता कामा नये अशी परिस्थिती तयार करता आली तर ते यशस्वी होईल.

शेतकरी संघटनेने पहिले आंदोलन केले ते कांद्याचे. कांदा हाच विषय का घेतला? सगळ्या हिंदुस्थानात जो कांदा पिकतो त्यातील ४०% एकट्या महाराष्ट्रात आणि त्यातील ४०% कांदा पुणे आणि नाशिक या दोन जिल्ह्यांत पिकतो. या दोन जिल्ह्यांनी कांदे बंद केले तर संपूर्ण हिंदुस्थानात कांद्याचे भाव ५ रुपये, १० रुपये ते अगदी ६० रुपये प्रतिकिलोपर्यंत चढतात आणि मग पंतप्रधानांची खुर्चीसुद्धा डळमळायला लागते. मागच्या वर्षी लासलगावच्या कांदा उत्पादकांचे शिष्टमंडळ पंतप्रधानांना भेटायला गेले तर त्यांना त्यांनी अगत्याने आणि अग्रक्रमाने भेट दिली आणि म्हणाले, 'तुम्ही कांदा उत्पादक म्हणजे मोठे जबरदस्त आहात. तुम्हाला आम्ही फार घाबरतो. तुमच्यामुळे आमची पाच राज्यांतील सरकारे पडली.' अशा तऱ्हेने कांदा थांबवता येतो इतकी ताकद शेतकरी संघटनेकडे होती म्हणून सुरुवातीच्या काळात संघटनेने फक्त कांद्याचाच लढा सुरू केला आणि जिंकला.

मग शेतकरी संघटनेने उसाचा प्रश्न हाती घेतला. कारण साखरेचेही गणित कांद्यासारखेच आहे. महाराष्ट्राचा हिंदुस्थानातील साखरेचा वाटा असाच परिणामकारक मोठा आहे. म्हणून नाशिक, सांगली, कोल्हापूर, सातारा अशा तीनचार जिल्ह्यांत ऊस कारखान्यांकडे जायचा थांबला तर सगळ्या देशाच्या (साखर)नाड्या आखडतात. हे लक्षात घेऊन तीनचार जिल्ह्यांच्या ताकदीवर ऊसआंदोलन यशस्वी होऊ शकले.

ज्वारीचे आंदोलन असे होईल का? ज्वारीचे आंदोलन करायचे असेल तर संघटना किती मोठी पाहिजे? महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश या चारही राज्यांमध्ये पंधरावीस टक्के ज्वारी तयार होते. तेव्हा, आंदोलनासाठी या चारही राज्यांत संघटना मजबूत असल्याशिवाय आंदोलन उभे करून काही उपयोग होणार नाही.

धानाची परिस्थिती तर त्याहून बिकट. हिंदुस्थानात धान न घेणाऱ्या घरी भात खाल्ला जातो त्याचा तांदूळ प्रामुख्याने पंजाबमध्ये पैदा झालेला असतो. पंजाबचे शेतकरी सगळ्यात जास्त धान पिकवतात, पण स्वतः भात खात नाहीत. हरियाणातही धान पिकते आणि तेथूनही तांदुळाचा पुरवठा देशभर होतो. म्हणजे, धानाच्या भावाचे आंदोलन करायचे तर त्यात पंजाबचे किसान हवेत, हरियाणाचेही हवेत, ओरिसा, बंगाल, आसाम, आंध्र प्रदेश, कर्नाटक येथील शेतकरीही त्यात पाहिजेत. महाराष्ट्रातसुद्धा भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर या जिल्ह्यांच्या बरोबरीने कोकणातील शेतकरी आंदोलनात उतरावे लागतील तरच धानाच्या भावाच्या आंदोलनात कांदा-उसाच्या आंदोलनासारखी परिणामकारकता येऊ शकेल. आपली संघटना एवढी मोठी असती तर धानाचे आंदोलन करता आले असते; पण संघटना नाही म्हणून आंदोलन नाही आणि आंदोलन नाही म्हणून संघटना नाही अशा चक्रात धानाचा शेतकरी अडकला होता. आज केवळ महाराष्ट्रच नव्हे तर देशातील किमान दहा राज्यांत शेतकरी संघटनेची ताकद तयार झाली आहे आणि त्या ताकदीच्या भरोशावर शेतकरी संघटना एका अर्थी माहेरी आली आहे, धानाच्या शेतकऱ्यांसाठी केलेला निश्चय पुरा करण्यासाठी धानाचा प्रश्न हाती घेऊन पुढे आली. आता धानाच्या शेतकऱ्यांनी जागे राहून लढायची तयारी ठेवली पाहिजे.

२ ऑक्टोबर, २००० या गांधी जयंतीच्या दिवशी मी हरियाणामध्ये पानिपतला गेलो. तिथे यंदा पहिली धानाची लढाई झाली. त्यांच्याकडील तांदूळ म्हणजे बासमतीसारखा चांगला लांबसडक. शेतकऱ्यांनी धान पिकवला, बाजारात आणला आणि सरकारी धान्य महामंडळाचे लोक म्हणायला लागले की हे धान काही आम्ही विकत घेणार नाही, घेतले तर कमी भावात घेऊ. कारण, हे धान मोडके आहे, सडके आहे, डागाळलेले आहे. आम्ही त्या सरकारी अधिकाऱ्यांशी बोलणी केली. 'वरच्या तुसाला डाग आहे; पण आतल्या दाण्याला काही डाग नाही. रेशनिंगसाठी धान भरडून तांदूळच देणार आहात तेव्हा डागाचा काही प्रश्न नाही.' असे म्हटल्यावर त्यांनी आणखी सबब सांगितली की दाणा मोडका आहे. मग आम्ही पंजाबमधील कृषी विद्यापीठाच्या तज्ज्ञांना बोलावून त्यांच्याकडून धानाची तपासणी केली. ते म्हणाले, ''हा तांदूळ संपूर्ण चोख नाही, खराब आहे; पण पाचदहा टक्केच खराब आहे. एवढं चालतं.'' मग आम्ही पानिपतला धानाच्या शेतकऱ्यांची परिषद घेतली आणि तेथील मंचावरून मी घोषणा केली, की सरकार जोपर्यंत आमचे हे धान खरेदी करीत नाही तोपर्यंत यापुढे हरियाणा आणि पंजाबमध्ये रस्त्यावर वाहने चालणार नाहीत. दोन्ही राज्यांमध्ये रास्ता रोको असा करू' आणि वेळही न घालवता परिषदेच्या ठिकाणाजवळच दिल्लीकडून अंबाल्याला जाणारा 'ग्रँट ट्रंक रोड' नावाचा इतिहासप्रसिद्ध रस्ता सभा संपल्याबरोबर परिषदेला आलेल्या सर्व किसानांनी अडवला. मॅजिस्ट्रेट आले, पोलिस आले; पण त्यांची थोडी पंचाईत झाली. नुसतेच शेतकरी असते तर त्यांनी पकडापकडी, पांगवापांगवी केली असती; पण मंत्रिपदाच्या पातळीवरील मी दिल्लीहून येऊन आंदोलनात बसलो होतो आणि अशा प्रसंगी अशा व्यक्तीवर काय कारवाई करावी याबद्दल पोलिसांच्या पुस्तकात कुठे काही लिहिलेले नाही. ३ ऑक्टोबरला मी दिल्लीला माझ्या कार्यालयात गेलो आणि भारतीय अन्नमहामंडळाच्या अधिकाऱ्यांना बोलावून घेतले आणि त्यांना विचारले, 'धान खरेदी करण्यात तुमची अडचण काय आहे?' त्यांनी हे धान खरेदी केले तर कसे नुकसान होईल वगैरे सांगितले. मी विचारले, 'किती नुकसान होण्याची शक्यता आहे?' ते म्हणाले, 'तीनशे कोटी रुपये!' मी त्यांना म्हटले, ''सरकारी नोकरांना पाचवा वेतन आयोग लागू करताना तीन हजार कोटी रुपये उधळायला सरकारला काही वाटत नाही आणि धानाच्या शेतकऱ्यांनी घाम गाळून पिकवलेल्या धानावर तीनशे कोटी रुपयांची खोट घ्यायला तुम्हाला जड जाते?'' दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात बातम्या आल्या की सरकारने तीनशे कोटी रुपये मंजूर केले आहेत आणि धानाची खरेदी चालू केली आहे.

धानाची लढाई द्यायची असेल तर महाराष्ट्रातील धानउत्पादकांनी महाराष्ट्रात द्यायची आणि हरियाणातील किसानांनी हरियाणात द्यायची असे

करून चालणार नाही. धान सगळ्या हिंदुस्थानभर पिकते, तेव्हा धानाची ही लढाई सगळ्या हिंदुस्थानभरच्या शेतकऱ्यांना एकत्रितपणे द्यावी लागेल.

आपण लढाई सुरू केली तर तुम्ही तुरुंगात जायला तयार आहात, मीही तुरुंगात जायला तयार आहे हे खरे आहे. पण एखादे वर्ष लढाई द्यायला चांगले असते. यंदाचे वर्ष कसे आहे. हरियाणा आणि पंजाबमध्ये गेल्या वर्षीचे खरेदी केलेले धान अजून गोदामात शिल्लक आहे. हिंदुस्थानात अन्नाचा दुष्काळ होता म्हणता म्हणता इतके उदंड धान्य झाले आहे की त्याला बाजारपेठ उपलब्ध नाही. गोदामे भरली आहेत म्हणून सरकारी खरेदी यंत्रणा आता धान घ्यायला कां कू करीत आहे. त्याच गोदामांमध्ये दोन महिन्यांच्या आत गहू भरावा लागणार आहे. तो कोठे ठेवावा असा प्रश्न त्यांच्यापुढे आहे. लढाई लढवायची असेल तर आपली बाजूही भक्कम असली पाहिजे. तुम्ही जर म्हणालात की आम्ही पाहिजे तितके धान आज पिकवू आणि त्या सगळ्या धानाला आम्ही सांगतो तितका भाव मिळायला पाहिजे तर मिळू शकतो, नाही असे नाही. पण काम तितकं कठीण. जन्मभर तुमच्या धानाला भाव मिळावा, तुमच्या मुलांनी पिकवलेल्या धानाला भाव मिळावा, नातवांनीही पिकविलेल्या धानाला भाव मिळावा अशी जर तुमची अपेक्षा असेल तर तुम्हाला यंदा नाही तरी या आयुष्यामध्ये, या पिढीमध्ये एकदोनदा तरी माझे ऐकायला लागेल आणि आंध्रातल्या शेतकऱ्यांनी जसे ठरवले की तंबाखूला जर इतका कमी भाव मिळत असेल तर आम्ही एकदोन वर्ष तंबाखू पिकवतच नाही, तसे तुम्हाला धान्याच्या बाबतीत करावे लागेल. नोकरदारांचे पाहा. ते जे मागतात ते मिळते. कारण, देत नाही म्हटले तर ते लगेच संपावर जातात. एखाददुसऱ्या वर्षी घरात वापरायला लागतात तेवढी धानाची पोती बाजूला ठेवा आणि नवीन धान पिकवायचेच नाही असे ठरवा. घरात धानाची पोती ठेवली आहेत त्यावर वर्षभर गुजराण सहज होऊ शकेल अशी तयारी ठेवली तरच या लढाईत जिंकायची शक्यता आहे.

या कार्यक्रमासाठी कसून तयारी करावी लागेल. धानाचा शेतकरी लहान लहान गावांमध्ये विखुरलेला, गावाला जायला रस्ता नाही, गावात वीज नाही, टेलिफोन नाही, एकमेकांशी संपर्क साधायला इतर काही साधन नाही अशा अवस्थेत सगळ्यांना एकत्र करणे जमायला हवे. एकएक काडी मोडता येते, सात काड्या एकत्र झाल्या तर त्यांना मोडता येत नाही हे लक्षात घेतले आणि सगळ्या राज्यांतील धानाचे शेतकरी एकत्र आले तर आपले आपल्या मुलाबाळांचे, नातवंडांचे भविष्य चांगले असेल.

काळ फार कठीण आहे. आपण मागासलेले आहोत. जगभरची बाजारपेठ खुली होते आहे. जगाच्या बाजारपेठेतसुद्धा भारतातील धान शेतकऱ्यांच्या दृष्टीने एक गोष्ट महत्त्वाची आहे. बाकीच्या वस्तूंच्या बाबतीत जगात इतरत्र तयार होणाऱ्या वस्तू चांगल्या आणि आपण त्यांची नक्कल करायची अशी स्थिती आहे. धानाच्या बाबतीत नेमकी उलट परिस्थिती आहे. हिंदुस्थानातील तांदूळ जगामध्ये एक क्रमांकावर आहे. हिंदुस्थानच्या बासमतीला तोड नाही म्हणून अमेरिकेत टेक्समती नावाने त्याची नक्कल करायला पाहतात.

**काळ कसा आला आहे?**

देशभरात खुल्या व्यवस्थेच्या नावाने कितीही आरडाओरड झाली तरी तिला आपण थोपवू शकत नाही. तेव्हा जे अटळ आहे त्याला घाबरून मागे फिरण्याऐवजी त्याचा सामना करणे केव्हाही सन्मानाचे होईल. मागे आहे ज्या सुरक्षित व्यवस्थेच्या नावाखाली शेतकऱ्यांना लुटणारी कसाई धोरणे राबविणारी सरकारशाही. आपला देश कमकुवत राहिला, अनेक बाबतीत मागास राहिला याला कारण सरकार आहे. हे सरकार आमचे कधी काळी काही भले करील यावर आमचा विश्वास नाही. त्यामुळे, जागतिक व्यापार संघटना ही संकट नसून तिच्या रूपातून सरकारशाहीच्या पिंजऱ्यातून सुटायचा मार्ग आम्हाला दिसतो आहे. पिंजऱ्याचा दरवाजा उघडा दिसला की वाघ जसा पुढे काय वाढून ठेवले असेल त्याचा विचार न करता बाहेर झेपावतो आणि स्वतंत्र होतो त्याप्रमाणे गुणाकाराची क्षमता बाळगणाऱ्या शेतकऱ्यांनी, विशेषतः त्यांच्या बछड्यांनी खुल्या व्यवस्थेच्या अवकाशात आपल्या बुद्धी आणि ताकदीनिशी झेप घेतली पाहिजे.

सगळ्या शेतकऱ्यांसाठी माझ्या मनात जो कार्यक्रम तयार होतो आहे तो काही मी तुमच्यासमोर ठेवणार नाही कारण तो कार्यक्रम मला राष्ट्रीय कृषिकार्यदलाचा अध्यक्ष म्हणून पंतप्रधानांसमोर मांडायचा आहे.

आज धानाच्या शेतकऱ्यांची परिस्थिती अशी की डोक्यावर मोठे कर्ज आहे, विजेचे बिल थकले आहे, वीज मंडळाचे लोक वीजजोडणी कापायला आले आहेत. आज रात्री जगायचे कसे इथपासून सुरुवात करायची आहे. काही काळामध्ये, सहा महिन्यांमध्ये, वर्षभरात, पाच वर्षात मनुष्य म्हणून सन्मानाने जगता येईल अशी स्थिती कशी काय आणायची हा आपल्यापुढील प्रश्न आहे.

देशाच्या संपूर्ण कृषिकार्यक्षेत्रालाच हा आजार झाला आहे. त्यावर औषध सुचवायला म्हणून पंतप्रधानांनी दिल्लीला बोलावले आहे. त्याच धर्तीवर तुम्हा धानउत्पादकांना मी औषधयोजना सांगणार आहे.

पहिले औषध : तुमच्याकडे वीज मंडळाचा मनुष्य वीज कापायला आला तर त्याला सांगायचे, 'तुमचे मंडळ सध्या घाट्यात आहे काय? आम्ही केव्हाचेच घाट्यात आहोत, तुझ्या सरकारने उणे सबसिडीने सालोसाल लुटल्यामुळे एका घाट्यातल्या माणसाने दुसऱ्या घाट्यातल्या माणसाकडे येऊन काय फायदा? ज्यांच्याकडे पैसा आहे त्यांच्याकडे जा. दोनदोनशे कोटींची बिले थकलीत ती करा की वसूल. तोपर्यंत तुला वीजबिलाचा पैसासुद्धा इथे मिळणार नाही. वीज कापलीच तर काय करायचे ते आम्ही बघून घेऊ. मी तुझे काहीही देणे लागत नाही असे म्हटल्यानंतरही तू वसुलीचा तगादा लावला किंवा वीज कापायला आला तर तुला मी दरोडेखोर समजेन आणि स्वसंरक्षणासाठी मला कायद्याने जे अधिकार दिलेत त्यांचा वापर करीन.' त्याखेरीज, नव्यानेच वीज महामंडळाचे अध्यक्ष बनलेले श्री. बन्सल यांनी धमकी दिली आहे की वीज बिलांच्या वसुलीसाठी आम्ही सशस्त्र पोलिसांची तुकडी पाठवू. तिकडे लाल किल्ल्यात कडेकोट पहारा असतानासुद्धा पाकिस्तानचे अतिरेकी सरळ सरळ घुसून पहारेकऱ्यांना मारून पळून निघून जातात तिथे सशस्त्र पोलिस पाठविण्याऐवजी धानशेतकऱ्यांवर काय पाठवता? आपण एक लक्षात ठेवायचे. पोलिस असो का लष्करी जवान असो तो गणवेषात असला तरी तो जर का बेकायदेशीर कृत्य करीत असेल तर त्याला गणवेषातील दरोडेखोर म्हणायला हवे आणि हिंदुस्थानच्या कायद्यामध्ये दरोडेखोरांपासून स्वसंरक्षण करण्यासाठी तुम्हाला जे काही आवश्यक वाटेल ते करण्याची कायदेशीर परवानगी आहे.

दुसरे : बँकांची कर्जे थकली आहेत हे खरे. बँकेची माणसे वसुलीसाठी आली तर त्यांना सांगा, 'आपण समोरासमोर बसू या आणि हिशोब कागदावर लिहू या.' मग, बँकवाला लिहील, 'इतके इतके मुद्दल त्यावर इतके इतके व्याज म्हणजे एकूण देणे इतके इतके' आपण शेतकरी, अशिक्षित. त्यालाच कागद घेऊन लिहायला सांगा, 'माझ्याकडे पाच एकर जमीन आहे. मी सत्तर क्विंटल धान पिकवतो. धान पिकवायचा खर्च येतो क्विंटलमागे १२०० रुपये आणि मला मिळतात ५०० ते ६०० रुपये. म्हणजे दरवर्षी ६०० रुपये प्रतिक्विंटल सरकारच्या लोकांना मी फुकट खाऊ घालतो. म्हणजे एका वर्षाच्या ७० क्विंटलचे ४२००० रुपये. अशी किती वर्षे मी खाऊ घालतो आहे, माझ्या आधी माझा बाप खाऊ घालत होता, त्याच्याआधी माझा आजोबा खाऊ

घालत होता. म्हणजे, मी तुम्हाला काही देणे लागत नाही. उलट तुम्हीच मला लाखो रुपये देणे लागता. ते पहिल्यांदा काढा नाहीतर निघा इथून.' एकदा का आपण कोणाचे देणे लागत नाही ही कल्पना स्पष्ट झाली की वसुलीसाठी जो कोणी येतो तो बँकेचा अधिकारी नसतो, तर दरोडेखोर असतो. त्याच्याशी कसे वागायचे ते कायद्याने सांगितले आहे.

तिसरे : सांगली-मिरजच्या अधिवेशनात शेतकरी संघटनेने सगळ्या लोकांना सांगितले ‑ फक्त शेतकऱ्यांना नाही ‑ की सरकार नावाच्या गोष्टीला एक पैसासुद्धा देऊ नका. कारण, सरकार हे दारूड्या नवऱ्याप्रमाणे झाले आहे. दारूड्या नवरा कामधाम काहीच करीत नाही. त्याची बायको बिचारी काबाडकष्ट करून मुलाबाळांना जगवण्याची धडपड करते, कसेबसे घर चालवायचा प्रयत्न करते. नवरा मात्र तलफ आली की बाहेर जाऊन कुठून कुठून पैसे जमवतो, त्याची दारू पितो आणि घरी येऊन वर बायकोपोरांना मारतो. या दारूड्या नवऱ्याला जर का बायकोने पैसे दिले तर तो आणखी दारू पिईल, बायकोपोरांना आणखी मारील. तेव्हा शहाणी बायको दारूड्या नवऱ्याच्या हाती एकही पैसा देत नाही. तसेच, आपल्या देशातले सरकार आहे. त्याला एक रुपया दिला तर त्यातले सत्तर पैसे तो सरकारी नोकरांना देतो - जे काहीही काम करीत नाहीत, काम करायचे म्हटले तर लगेच हात पुढे करतात; कामे होण्यापेक्षा कामे खोळंबून कशी राहतील अशीच धडपड करतात. म्हणजे तुम्ही दिलेल्या रुपयातील सत्तर पैसे देश बुडविणाऱ्या लोकांना देणारे सरकार हे दारूड्या नवऱ्यासारखेच आहे. तेव्हा यापुढे या दारूड्या नवऱ्याला एक पैसाही देऊ नका. बँकांची कर्जे देऊ नका, विजेची बिले देऊ नका, कोणतेही कर देऊ नका, सेस भरू नका. हा कार्यक्रम कठोरपणे राबवला तरच देश सुधारायची आशा आहे.

ही तीन औषधे दरवाजावर उभ्या राहिलेल्या आजारांसाठी झाली. पण तेवढ्याने प्रश्न सुटत नाही. आता याच्यापुढे सरकारपुढे जाऊन 'आम्हाला एक क्विंटल धान्य पिकवायला १२०० रुपये खर्च येतो आणि मिळतात फक्त ५४० तर उरलेले ६६० रुपये द्या' म्हणून मागणी केली, तर सरकार म्हणेल वरचे ६६० रुपये कसले मागता, यंदा आम्ही गेल्या वर्षीपेक्षा ६० रुपये कमीच देणार आहोत. ही नुसती कल्पना नाही. गव्हाच्या बाबतीत हे घडते आहे. खरोखरी, पुढच्या वर्षी धानाला ५०० रुपयेसुद्धा भाव मिळणार नाही ही शक्यता लक्षात ठेवूनच पुढची आखणी करायला हवी.

१२०० रुपये खर्चायचे आणि ५०० रुपये मिळवायचे या घाट्याच्या धंद्यातून मार्ग कसा काढायचा? माझा उपाय असा की आम्हाला आता सरकार नकोच. शेतकरी संघटनेच्या आधीच्या घोषणेत 'हवे घामाचे दाम' असे शब्द होते, आता 'घेऊ घामाचे दाम' असे आहेत. तेव्हा शेतीमालाचे भाव 'घेण्या'साठी काय करायचे हे आपणच ठरवायला हवे, ते सरकारचे काम नाही. आपल्याला आता अशी व्यवस्था करायला हवी की आमची जमीन, आमची माणसे, जरूर भासल्यास कर्ज गोळा करून आमचे भांडवल आणि चांगल्यात चांगले बियाणे, चांगल्यात चांगले पीक, चांगल्यात चांगले उत्पादन काढून खर्च करू, तयार झालेला माल साठवण्याची व्यवस्था करू, त्यावर प्रक्रिया करून कुरमुरे, चुरमुरे, चकल्या जो काही पक्का माल तयार करू, देशभरच्या बाजारपेठेत विकायची व्यवस्था करू आणि परदेशातही पाठवायची व्यवस्था करू. असे जर झाले तर किती भाव मिळेल? भाव किती मिळेल हे आज नाही सांगता येणार. पण आज १२०० खर्च करून ६०० च मिळतात, इतके कमी मिळणार नाहीत याची मला खात्री आहे. अर्थात्, त्यासाठी मोठ्या प्रमाणावर जमिनी एकत्र करून शेतकऱ्यांची कंपनी तयार करायला हवी.

सध्या जमीन पिकवून काय मिळते? एकरी ७००० रुपये तोटा होतो असा धानाच्या शेतकऱ्यांचा अनुभव आहे. हीच जमीन भाडेपट्टीने द्यायची झाली तर नागविदर्भ भागामधील भाव एकरी १००० रुपये आहे.

म्हणजे, या भागातील तरुणांना एकत्र येऊन अशी एखादी कंपनी तयार करता येईल की जी शेतकऱ्यांच्या जमिनी एकत्र करील, ते करताना शेतकऱ्यांना एकरी वार्षिक ११०० रुपये मिळण्याची हमी देईल, या एकत्र शेतीवर जे काही पीक घेतले जाईल त्यात होणाऱ्या कामात जमीनमालक शेतकरी कुटुंबांना प्राधान्य देऊन इतर कंपन्यांच्या धर्तीवर श्रममोबदला दिला जाईल, कंपनीच्या शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जागतिक स्पर्धेत उतरेल आणि टिकेल असे उत्पादन काढील, त्याच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यापाराची सोय करील आणि त्यातून जो काही निव्वळ नफा होईल तो डिव्हिडंडच्या रूपाने शेतकऱ्यांना त्यांनी कंपनीत गुंतविलेल्या जमिनींच्या प्रमाणात पोहोच करण्याची व्यवस्था करील. अशा प्रकारची व्यवस्था उभी करण्याचे तरुणांनी ठरवले तर शेतकऱ्यांप्रमाणेच, सरकारशाहीला विटलेले, सरकारशाहीच्या जोखडातून मुक्त होण्यास आतुरलेले अनेक व्यावसायिकही त्यांच्या पाठीशी उभे राहतील.

नागविदर्भ परिसरातील या धानउत्पादक शेतकऱ्यांघरच्या तरुणांनी असे धाडस करून 'नागविदर्भ धान कॉर्पोरेशन' सारखी एखादी कंपनी उभी करण्याचा निर्धार केला तर ते खऱ्या अर्थाने पिंजऱ्याच्या उघड्या दारातून बाहेर झेपावून स्वतंत्र होणाऱ्या वाघाचे कृत्य ठरेल.

(पूर्वप्रसिद्धी - ६ फेब्रुवारी २००१)

sharadjoshi.mah@gmail.com

■■

**शेतकरी संघटक पाक्षिकाच्या मालकीसंबंधी**
**फॉर्म नं. ४ रुल नं.८ अन्वये निवेदन**

| | | |
|---|---|---|
| **१. प्रकाशन स्थळ** | : | पिनाक, २४४-समर्थनगर, औरंगाबाद ४३१००१ |
| **२. प्रकाशन काळ** | : | पाक्षिक |
| **३. संपादक, प्रकाशक** | : | नाव - सुरेशचंद्र पांडुरंग म्हात्रे<br>राष्ट्रीयत्व - भारतीय<br>पत्ता-अंगारमळा, मु. पो. अंबेठाण, ता. खेड, जि. पुणे. |
| **४. मुद्रक** | : | उदय एंटरप्राईजेस, सिडको, औरंगाबाद. |
| **४. वृत्तपत्राची मालकी व भांडवलात १% पेक्षा अधिक भागी असणारांची नावे व पत्ते** | : | सुषमा मोहनलाल परदेशी,<br>(कै.) मोहन बिहारीलाल परदेशी<br>मु. पो. चाकण, ता. खेड, जि. पुणे. |
| **५. रजि. क्रमांक** | : | RN 39926/1983 |

मी जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहे.

अंबेठाण
२१ मार्च २०११

**सुरेशचंद्र म्हात्रे**
प्रकाशक



पी. साईनाथ

# काँग्रेसची उलटीच खूण गुन्हेगारा थोरपण

> निवृत्त न्यायमुर्ती गांगुली यांनी असे म्हटले होते की विलासरावांची ही कृती म्हणजे काही विशिष्ट लोकांवर खास मर्जी दाखवणे होय. जेव्हा संबधित आरोपींच्या कृष्णकृत्यांची माहिती मुख्यमंत्र्यांना होती तेव्हा त्यांनी तिकडे दुर्लक्ष करून सावकाराला अटक होण्यापासून वाचवणे अत्यंत धक्कादायक असून शासनाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या, घटनेने दिलेल्या पदावरून राज्य करणाऱ्या जबाबदार व्यक्तींकडून जेव्हा हे झाले ते पाहून आमच्या सद्सद्विवेक बुद्धीला हादरा बसला आहे.' तेव्हा या पापाच्या बदल्यात मनमोहनसिंगांनी त्यांना बढती दिली आणि देशाचे ग्रामविकास मंत्रालय त्यांच्या हाती दिले. शेतकऱ्याचे शोषण करणाऱ्या सावकाराला निर्लज्जपणे पाठिशी घालणाऱ्या या असल्या 'आदर्श' राजकारण्याच्या हाती देशाचे ग्रामविकास मंत्रालय सोपविणे यापेक्षा शेतकऱ्यांची क्रूर थट्टा दुसरी काय असू शकते?

काही माणसे नाव घेऊनच जन्माला येतात. आपले माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख त्यातलेच एक. नसता एवढ्या भानगडींत त्यांचे नाव गुंतले तरीही त्यांच्या केसालाही धक्का लागला नाही असे झालेच नसते. त्यांचा आजवरचा राजकीय इतिहास पाहता त्यांना आता एक बढती मिळण्याची वेळ आलेली आहे असे म्हणावे लागेल. सरकारी जमीन परस्पर सुभाष घईंना दिल्याबद्दल मुंबई उच्च न्यायालयाने नुकतेच त्यांच्यावर ताशेरे ओढलेले आहेत.



या आधी जेव्हा सर्वोच्च न्यायालयाने एका प्रकरणात विलासरावांनी मुख्यमंत्री असताना आपल्या अधिकारांचा गैरवापर करून एका सावकाराला अटक होण्यापासून वाचवले असा निकाल दिला. एवढेच काय तर २जी प्रकरणात सगळे परवाने रद्द करणारे निवृत्त न्यायमुर्ती गांगुली यांनी असे म्हटले होते की विलासरावांची ही कृती म्हणजे काही विशिष्ट लोकांवर खास मर्जी दाखवणे होय. हेही असे लोक ज्यांनी बहुसंख्य शेतकऱ्यांची पिळवणूक केली आहे आणि त्याविरुद्ध दाद मागण्यासाठी त्यांनी पोलिसांत तक्रार केली आहे. जेव्हा संबधित आरोपींच्या कृष्णकृत्यांची माहिती मुख्यमंत्र्यांना होती तेव्हा त्यांनी तीकडे दुर्लक्ष करून सावकाराला अटक होण्यापासून वाचवणे अत्यंत धक्कादायक असून शासनाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या, घटनेने दिलेल्या पदावरून राज्य करणाऱ्या जबाबदार व्यक्तींकडून जेव्हा हे झाले ते पाहून आमच्या सद्सद्विवेक बुद्धीला हादरा बसला आहे' तेव्हा या पापाच्या बदल्यात मनमोहनसिंगांनी त्यांना बढती दिली आणि देशाचे ग्रामविकास मंत्रालय त्यांच्या हाती दिले. शेतकऱ्याचे शोषण करणाऱ्या सावकाराला निर्लज्जपणे पाठिशी घालणाऱ्या या असल्या 'आदर्श' राजकारण्याच्या हाती देशाचे ग्रामविकास मंत्रालय सोपविणे यापेक्षा शेतकऱ्यांची क्रूर थट्टा दुसरी काय असू शकते? इतकेच काय तर सदर प्रकरणात न्यायालयाने ठोठावलेला रु १०,००,०००/- चा दंडही महाराष्ट्र शासनाला भरायला लावला.

विलासरावांची विक्रम प्रस्थापित करण्याची मालिका इथे संपत नाही. ते मुख्यमंत्री असताना महाराष्ट्रात ३०,००० पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत म्हणजे एकूण झालेल्या आत्महत्यांच्या अर्ध्याहूनही जास्त! २००६ मध्ये ते मुख्यमंत्री असताना ४, ४५३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. देशातल्या या सर्वांत जास्त आत्महत्या आहेत. याच विलासरावांनी २००४ साली निवडणुकांच्या आधी कापसाचे भाव रु. ५०० ने वाढवण्याचे 'आश्वासन' दिले होते आणि सत्तेवर आल्यावर दिला जाणारा रु. ५०० चा अग्रीम बोनस बंद केला, भाव वाढवणे तर राहिले दूर! आणि त्यामुळे कापूस पिकवणारा शेतकरी कर्जाच्या खाईत लोटला गेला आणि आत्महत्यांचे प्रमाण वाढले. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांविषयी छेडले असता विदर्भाच्या दौऱ्यावर गेलेले विलासराव तेव्हा म्हणाले की, 'आत्महत्या करणे हा गुन्हा आहे; पण आम्ही एकाही शेतकऱ्यावर गुन्हा दाखल केला नाही' त्यांच्यासोबत असलेले शंकरसिंह वाघेला म्हणाले की शेतकरी आळशी असल्यामुळे त्यांना आत्महत्या कराव्या लागत आहेत! निब्बर कातडी आणि निलाजरेपणाचे यापेक्षा उत्तम उदाहरण दुसरे असू शकते काय?

२००५-२००८ या काळात राज्याच्या विकासाचा वेग खुंटल्यामुळे एकूण २० लाख रोजगारांची निर्मिती झाली नाही असे सरकारी आकडेवारी सांगते आणि हे सर्व २००८ च्या शेअर बाजाराच्या घसरणी पूर्वी!

पण वरील पैकी कोणत्याही 'पापामुळे' त्यांचे मुख्यमंत्रीपद गेले नाही. ते गेले त्याचे कारण त्यांनी राम गोपाल वर्माला घडवून आणलेली होटेल ताजची सहल.

आदर्श प्रकरणातही विलासरावांचे नाव गुंतलेले आहे. त्या संबंधातल्या फाईली ज्या राज्य शासनाच्या विविध कार्यालयांत सुरक्षीत असायला हव्यात त्या 'गहाळ' झाल्या आहेत.

हे सर्व कमी म्हणून की काय मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्र शासनाने, विशेष करून तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी, 'आपल्या अधिकारांचा गैरवापर करून, सर्व नियम-कायदे धाब्यावर बसवून सुभाष घई यांना मुंबईमधील तब्बल २० एकर जमीन कवडीमोल भावाने दिल्याचा' ठपका ठेवला आहे.

विलासरावांचा इतिहास पाहता त्यांच्या वाईट कर्माचे फळ त्यांना बढती मिळण्यातच झालेले आहे. आता काय पुन्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पद त्यांना देण्यात येणार आहे काय?

(साभार : दि हिंदू - या दैनिकातील पी. साईनाथ यांच्या लेखाचे केलेले स्वैर भाषांतर)

■■

# काही घडलंच नाही!

नका नका लोकहो असे डोळे वटारून आमच्याकडे पाहू नका. असं आम्ही केलं तरी काय ज्याच्यामुळे तुम्ही आमच्याकडे असे रोखून पाहत आहात. जे काय केलं, जे काय झालं ते काही लपूनछपून केलं नाही. तर सरेआम केलंय. त्यात लपवण्यासारखं काहीच नाही. नाहीतरी, ज्यांना काही लाजलज्जा असते त्यांना लपवावसं वाटतं. आमचं काय सारं उघड परब्रह्म. बरं, आम्ही आज जे काय केलं किंवा खरं सांगायचं तर जे काय करू पाहत होतो ते तर फारा पूर्वीपासूनच आम्ही करत आलो आहोत. फार जुनी गोष्ट नाही. काल-परवाच नाही का? आमचे अध्यक्ष स्वत: बोलले होते. त्या तिरंगा यात्रेप्रसंगी की आम्हाला त्यातला किस्सा दिल्लीपर्यंत पोहोचवावा लागतो म्हणून? म्हणजे आमची जातकुळी, थेट दिल्लीपासून अशी आहे मग आम्ही कसे बरे असणार त्यापेक्षा वेगळे! अहो, ही एक गावरान म्हण आहे बघा. 'वरमाय शिंदळ तर वऱ्हाडणीला काय बघायचं.' वरचेच जर असे तर आम्ही खालचे कसे?

बरं, जे काही 'झालेलं' होतं ते सारं पाच-पाचशेच्या नोटांच्या बंडलात होतं आणि ते सारं तुम्हा मतदारांना वाटण्यासाठीच होतं. हे तर तुम्हाला माहीत, आम्हाला माहीत, पोलिसांना माहीत आणि निर्वाचन अधिकाऱ्यालाही माहीत होतं. मग ते पकडून तुम्ही तुमचंच नुकसान करून घेतलंत की! आमचं काय जाणार असेल बरं? आमच्यासाठी एक कोटी म्हणजे दरीया में खसखस हो! जरा आमच्या श्रेष्ठीकडे बघा आमच्या बोफोर्समध्ये कित्येक वर्षांपूर्वी आकडा शेकडो कोटींतला होता. काय झालं त्या केसमध्ये? काही काळ आम्हाला सत्तेतून जावं लागलं एवढंच; पण आमच्यावर काही परिणाम झाला का? अहो, न्हाव्याच्या दुकानातून बाहेर पडताना आपण कपडे झटकून चालू लागतो. तसंच आम्ही केलं झालं!

बोफोर्सवरच आम्ही थांबलो का? त्यापुढेही दिल्लीत ऑलिंपिक खेळ, २जी स्पेक्ट्रम असे अगडबंब खेळ आम्ही चालू ठेवले. काय होणार आहे त्यातून? चार-दोन छोटे मासे बळी जातील एवढंच. आम्हासारख्या मोठ्या माशांना कुणी हात लावू शकणार आहे का? हां, तोंडी लावण्यापुरता एखाद-दुसरा मोठा मासा गळाला लागू देऊन आम्ही आमची सुटका करून घेणार पण शेवटी काय होणार? आम्ही सुखरूप बाहेर येणार आणि तुम्ही आम्हालाच परत, परत परत निवडून देणार!

बरं, दिल्लीचं एक सोडून द्या हो, आपल्या महाराष्ट्राचंच बघा ना! आमचे तीन-तीन माजी मुख्यमंत्री जनतेपुढे 'आदर्श' निर्माण करताहेत. एक माजी उपमुख्यमंत्री नाशकात दिवे लावताहेत. काय होणार त्यांचं? हा विचारसुद्धा मनात येऊ नका. अहो, चौकशी आम्हीच करणार, पुरावे आम्हीच गोळा करणार आणि कोर्टात काय नि कसे पुरावे सादर करायचे हेही आम्हीच ठरवणार. मग त्यातून काय निष्पन्न होणार हे काय सांगायला पाहिजे. आमचा बाल बाका होणार नाही. हे तर तुम्हालाही ठाऊक आणि आम्हाला तर माहीत आहेच. आत्ता कुठे एक वर्ष झालंय 'आदर्श'ला. आत्ता तर कुठे हायकोर्टानं लाथ मारली आहे शोधयंत्रणेला आणि इडीला. या एवढ्या लत्ताप्रहारानं आम्हाला काय बरं होणार? राजेहो, झोपी गेलेल्याला जागं करता येतं; पण झोपेचं सोंग घेणाऱ्यांना कसं बरं जागं करता येणार?

कुठल्या तरी एखाद्या 'नॉलेज सिटी'चं प्रकरण बाहेर काढलं की तुम्हाला धन्यता वाटते. त्या आधी इंडिया बुलची देणगी बाहेर आली होती. जो देणगी देणार त्यालाच कंत्राट मिळणार किंवा जो देणगी वा 'देणं' मान्य करणार त्यालाच कंत्राट मिळणार असा सरळ सरळ हिशेब झाला ही तर आमची रीतच झाली जगण्याची.

'क्या खूब सौदा नक्द है
इस हाथ दे उस हाथ ले'

कुठला कोण कर्वे का बर्वे येतो आणि नॉलेज सिटीतून आमचं बस्तान उचलू पाहतो. ठिकय, तात्पुरतं काहीतरी घडेल. थोडा आवाज होईल आणि काही काळानंतर सारं कसं शांत शांत. पुन्हा आमचे 'भारतीय बैल' आणि आम्ही पैशांचा गाडा असाच ओढत राहू. बाय द वे 'भारतीय बैलाची' फार वरच्या लोकांशी बांधिलकी आहे म्हणे असं ऐकलंय खरं. खरं खोटं घड्याळच जाणे, आपल्या कानाला सात बोळे.

आता तुम्हीच सांगा काहीतरी भलं करायचं झालं, तर थोडं तरी बुरं होणारच ना! महाभारतात नाही का म्हटलेलं आहे की, मोठं पुण्य करण्यासाठी छोटं पाप केलं, तरी ते माफ आहे. आम्ही लोकांच्यासाठी 'ज्ञान नगरी' उभारताना एखाद्या भारतीय बैलाला 'कुंकू लावलं' तर त्यात काय बरं बिघडलं. आणि आता एवढी मोठी 'ज्ञान नगरी' उभारताना त्यातलाच एखादा कोपरा नाही एखादा मजला आम्ही आमच्यासाठी घरोंदा म्हणून वापरला तर त्यात काय बरं बिघडलं. त्याहीशिवाय आम्ही आमच्या लाडक्या लेकीसाठी आणखी एखादा कोपरा म्हणजे मजला हो-जर राखून ठेवला, तर त्यातही कुणाच्या बापाचं काय जातं? आम्ही जर करोडो रुपये देऊ शकणारी जागा फुकटही घेऊ शकलो असतो तरीही मनाचा मोठेपणा दाखवत आम्ही अल्प का होईना भाडं भरत आहोत याचं खरं म्हणजे कौतुकच व्हायला पाहिजे होतं? उलट कर्वे-बर्वे आमच्यावर आरोप करताहेत? खरं तर असं आहे राव, आम्हासारख्या ओबीसींनी केलेली प्रगती कुणाला पाहावत नाही. म्हणून असली प्रकरणं उकरून काढतात आणि आम्हाला बदनाम करू पाहतात. हां, एवढं मात्र आम्ही मान्य करतो की, आम्हासारख्या थोर माणसांवर चिखलफेक केली तर त्यांच्याही नावाची चर्चा होते. नाही तर, आमच्यावर चिखलफेक करणाऱ्या या असल्या फडतूस माणसांना विचारतो कोण? एखाद्या अंधाऱ्या रात्री गल्लीत गोळी घातली तर अशांच्या अंत्यविधीसाठी कुणी येणारही नाही. तेव्हा चर्चेत नाव होण्यासाठीच केवळ हा सारा खटाटोप असतो. नाहीतरी काय -

'चर्चे हुआ करते हैं बुलबुले नाशाद के
कंबख्त कौओं को पुछताही कौन है'

जाऊ द्या झालं! कोळसा उगाळावा तितका काळाच. नाही म्हणजे कोळसा उगाळणे हे विधान आमच्यासाठी नसून आमच्या विरोधकांसाठी आहे. हे कृपया लक्षात घ्यावे. अरे आम्ही तर राजहंस आहोत. आमच्यावर कितीही काळं फासण्याचा प्रयत्न केला तरी आमचे राजकीय पांढरेपण काळवंडणार नाही. कुणीतरी म्हणतं की, तुमचं म्हणजे आमचं हो, पांढरेपण काळवंडणारच नाही. कारण मुळातच ते, काळवंडलेलं आहे. म्हणा लेको म्हणा, तुम्ही काहीही म्हणालात तरी आमचे धंदे आय मीन आमचा विकास कामांचा ध्यास आणि आम आदमी के साथ कमी होणारच नाही. तुम्ही ओरडतच राहा आम्ही गिळंकृत करतच राहतो.

परत एकदा जाऊ द्या. मूळ मुद्दा होता डोळे वटारून पाहायचा. एक कोटी रुपयांचा हिशेब सरळ सोपा होता. ८७ वॉर्ड म्हणजे ८७ उमेदवार. प्रत्येकी एक लाखाप्रमाणे झाले ८७ लाख. उरले तेरा लाख ते आमच्या कार्यालयाला रंगरंगोटी करायला आय मीन आमच्या कार्याची रंगरंगोटी करायला आणि इतर खर्चाला नको का? कुणी म्हणेल रंगरंगोटी करायला कार्यालय किंवा कार्य आहेच कुठे? राजेहो, खर्च करायचा झाला तर कार्यालय किंवा कार्य पाहिजेच असं सांगितलंय कुणी? रंगरंगोटीचं बिल असलं की झालं, आमच्या ऑलिंपिक समितीने नाही का? कामाची केवळ बिलं दिली? सडका नसूनही पैसे उचललेच ना! झालं तर मग. त्याही पलीकडे पैसा आमच्या पक्षाचा. आम्ही तो पैसा गायीसाठी खर्च करू नाही तर बाईसाठी खर्च करू, झालंच तर वाईनवर खर्च करू, तुमच्या पोटात का दुखतं? कुणा शहाण्यानं शंका काढली म्हणे, की वर्गणी गोळा करून जर एक कोटी जमा केले असतील? तर ती वर्गणी पाचशेच्या करकरीत नोटांच्या

बंडलातच कशी काय आली? लेकहो असल्या फुटकळ शंका काढू नका, दहा आणि शंभराच्या देणगीनं काय एक कोटी जमा होतात, अहो, राजे महाराजे जेव्हा भीक मागतात तेव्हा त्यांच्या झोळीत हिरे-माणके टाकली जातात. भिकारी दारावर येतो तेव्हा शिळं-पाकं अन्नच मिळतं हे विसरू नका. हिरे माणके आमच्या झोळीत टाकणारे हे सोन्या-हिऱ्याच्या खाणीची उलट अपेक्षा करतात. हेही विसरू नका आणि ज्या देशात फरदीन खान, सलमान खानसारखे फुटकळ नट, परेरासारखे उद्योगपती पुत्र सहज सुटून जातात तिथे आम्हासारख्या थेट वर हात असलेल्या माणसांना काय मजाल आहे पोलिसांची हात लावायची. बघा ना, पहिल्याच फटक्यात यातील आरोपी कम साक्षीदार कम भागीदारानं आपली साक्ष बदलली आहे आणि मंत्र्याचं घर सोडून आता तो कार्यालयातून पैसे आणल्याचं सांगत आहे. राजेहो या पुढे तर साक्षीदार सोडा पोलिसच जवाब देतील, असा काही प्रकार झालाच नाही म्हणून. आता पोलिसांनीच जर खाका बगला वर केल्या तर बिचारे निर्वाचन अधिकारी तरी काय करणार? त्यांना तर एरवीच निमित्त पाहिजे. हात झटकायला त्यांच्या प्रमोशनचा बदलीचा प्रश्न आहे. तेव्हा लोक हो, लक्षात घ्या काही घडलंच नाही.

'ना बडी किल्ड जेसिका!'

**- बाबू सोंगाड्या**

babu.songadya@gmail.com

■■

## वर्धा जिल्हा - स्वभाप जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निकाल

| केंद्र | उमेदवाराचे नाव | प्राप्त मते | परिणाम |
|---|---|---|---|
| जि.प विरुळ | गजानन निकम | ३२३८ | विजयी |
| जि.प सावली | चंद्रमणी भगत | २०७८ | विजयी |
| जि.प गिरड | विणा राऊत | ३४९१ | विजयी |
| जि.प शेकापूर | रेखा हरणे | २०६९ | पराभूत |
| जि.प समुद्रपूर | वर्षा व्यापारि | २४५० | पराभूत |
| पं.स. विरुळ | ताराबाई ताडाम | २०३७ | विजयी |
| पं.स. नांदगाव | सुजित बुरबुरे | ११९८ | विजयी |
| पं.स. मोहगाव | दमडू मडावी | २०६५ | विजयी |
| पं.स. गिरड | चंदा कांबळे | १६०६ | पराभूत |
| पं.स. शेकापूर | वर्षा बिडकर | १४२८ | पराभूत |
| पं.स. रसुलाबाद | विलास कटारणे | १०८९ | पराभूत |
| पं.स. सिरुड | गजानन कुडमेथे | १०६५ | पराभूत |
| पं.स. सावली | शशिकला मंडाळी | ९७८ | पराभूत |
| पं.स. कुटकी | अरुण सावंकार | ७०८ | पराभूत |
| पं.स. समुद्रपूर | माया भोले | ६५२ | पराभूत |
| पं.स. जाम | भुषणा महाकाळकर | ६३५ | पराभूत |
| पं.स. सावंगी झाडे | प्रविण महाजन | ५५६ | पराभूत |



मा. ना. शरदचंद्रजी पवार


मा. कमलकिशोर कदम


मा. आ. जयप्रकाश दांडेगावकर

मा. राजेंद्र जाधव महागांवकर

# पूर्णा ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज

फोन : ०२४५४-२२१४८८/२२००१८ फॅक्स : ०२४५४-२२१२९७ Email : purnasakhar@hotmail.com/ purna_sakhar@sancharnet.in

**१) पूर्णा सहकारी साखर कारखाना लि. वसमतनगर. युनिट क्र. १**
**२) पूर्णा स.सा. का. लि., युनिट क्र. ३ (बाराशिव हनुमान)**
**३) १८ मे.वॅ. सहवीज निर्मिती प्रकल्प**
**४) ३० केएलपीडी क्षमतेचा आसवाणी प्रकल्प.**
**५) २० केएलपीडी क्षमतेचा इथेनॉल प्रकल्प.**

## : आमची दर्जेदार उत्पादने :

*** शुभ्र दाणेदार साखर * औद्योगिक व मद्यार्क निर्मितीसाठी अल्कोहोल व इथेनॉलचे उत्पादन**
*** वीज निर्मिती * पूर्णा - ११ भूसंवर्धक.**

**(असलम शेख)** प्र. कार्यकारी संचालक

**(आ. जयप्रकाश दांडेगावकर)** ज्येष्ठ संचालक

**(राजेंद्र जाधव-महागांवकर)** उपाध्यक्ष

**(कमलकिशोर कदम)** अध्यक्ष

**सन्माननीय संचालक मंडळ**

**सर्वश्री** पांडुरंगराव कदम, पंडितराव देशमुख, बापूराव बेले, प्रल्हाद चापके, रावसाहेब इंगोले, विश्वनाथ चव्हाण, शिवाजी सवराते, शहाजी देसाई, बापूराव घाटोळ, डॉ. संजय लोलगे, रुस्तुमराव वंजे, गोरखनाथ पाटील, सौ. कुशावर्ताबाई धवन, सौ. अंजनाबाई झुंझुर्डे, धोंडीरामजी अंभोरे, गंगाधर बेंडे, विश्वनाथ गारूडे, राजाभाऊ भालेराव, मारोती दुथडे, सौ. शकुंतलाबाई काळे, उत्तमराव लोखंडे, गोपाळराव कदम, मा. प्रादेशिक सहसंचालक (साखर) नांदेड, डी. जी. हेर्लेकर मानद संचालक (तांत्रिक)

# कर्तबगारी उद्धवची, प्रकाशझोत राजवर

उद्धवच्या नेतृत्वाखाली शिवसेना लगेच धर्म निरपेक्ष होईल आणि जात, प्रांत याचा भेदभाव न मानता आर्थिक प्रश्नावर लक्ष केंद्रीत करील असे मानने भाबडेपणाचे होईल; पण त्या दिशेने शिवसेनेला एक पाऊल पुढे नेण्याची ताकद या निवडणुकीने उद्धवला दिली आहे. या दिशेने पुढे जाण्याशिवाय उद्धव समोर पर्यायही नाही. उद्धवने शिवसेनेला परत पूर्वीच्या वळणावर न्यायचे ठरविले तर मात्र शिवसेनेला उद्धवच्या नाही तर राज च्या नेतृत्वाची गरज भासेल!



सुधाकर जाधव

महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील गावातील मतदारांनी निष्ठापूर्वक मतदान केलेल्या पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकांचे परिणाम महानगरातील निष्ठापूर्वक मतदान न करणाऱ्या बहुसंख्य मतदारांची वस्ती असलेल्या महानगराच्या महापालिकेच्या निवडणूक परिणामा पुढे अक्षरशः झाकोळले गेलेत. इंडिया आणि भारत यांच्यातील दरी आणि भारताचे दुय्यमत्व या निमित्ताने माध्यमांनी अधोरेखित केले. इलेक्ट्रॉनिक माध्यमांनी तर खाली एका पट्टीत बारीक अक्षरात आणि तेही उशिरा माहिती देऊन पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकीबाबतचे आपले कर्तव्य पार पाडले. जणू काही या निवडणुका कुठल्यातरी दूर देशातील आहेत व त्यामुळे त्यांच्याशी काही देणे घेणे नाही या थाटात पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकांचे वृत्त दिले गेले. रात्रंदिवस महानगरातील निवडणुकांचे वृत्त देण्यात व त्याचे विश्लेषण करीत बसण्यात माध्यमांनी धन्यता मानली. माध्यमांनी महानगर पालिका व जि.प., पंचायत समित्या या बाबत कमालीचा भेदभाव दाखविला असला तरी मतदान करणाऱ्या मतदारांची मानसिकता दोन्ही ठिकाणी सारखीच होती आणि त्यात काडीचाही फरक नव्हता हेच महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीचे परिणाम दर्शवितात. मतदान करणाऱ्या शहरी आणि ग्रामीण भागातील मतदारांनी कोणत्याही राजकीय पक्षावर विश्वास व्यक्त न करता लोकशाही प्रक्रीयेवरील विश्वास तेवढा व्यक्त केला आहे. मात्र सरसकट सर्वांना नाकारण्याऐवजी त्यांना आगामी विधानसभा निवडणुकीपर्यंत चांगले काम करून दाखविण्याची संधी देण्यासाठी फार उलटफेर न करण्याचा परिपक्व निर्णय मतदारांनी घेतल्याचे दिसून येते. जैसे थे स्थिती ठेवत असतानाच आपले असमाधान प्रकट होईल याची पुरेपूर दक्षता मतदारांनी घेतली आहे. म्हणूनच शहरी आणि ग्रामीण या दोन्ही भागातील मतदारांनी सर्व पक्षाच्या डोक्यावर टांगती तलवार ठेवून त्यांना अधिक जबाबदारीने वागण्याचा आणि लोकांच्या समस्या सोडविण्यावर भर देण्याचा इशारा मतदानाद्वारे दिला आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत मतदारांनी काँग्रेस पक्षावर जास्त विश्वास टाकला होता आणि त्या विश्वासास पात्र ठरण्या लायक काँग्रेसची कामगिरी नसल्याने स्वाभाविकपणे मतदार त्यांच्याशी थोडे कठोर वागले आहेत असे म्हणता येईल. सर्वच पक्षाची कामगिरी मतदारांना समाधानकारक वाटली नसली तरी मतदारांचा पूर्ण भ्रमनिरास झाला आहे अशी स्थिती नाही. अन्यथा मनसेसारख्या नवीन पर्यायाकडे मतदार मोठ्या प्रमाणात वळले असते. फुफाट्यातून आगीत पडणार नाही अशी सावधानता मतदारांनी घेतलेली दिसते; पण अन्य पक्ष सुधारणार नसतील तर मनसे सारख्या नवीन पक्षाला समर्थन द्यायला आम्ही मागे पुढे पाहणार नाही असा सूचक इशारा सर्वाना मिळण्याइतपत मतदारांनी मनसे चे समर्थन केले आहे; पण मनसेवर विश्वास टाकला नाही. याचा अर्थ मतदारांनी मतदान विचारपूर्वक, जाणीवपूर्वक आणि मुत्सद्दीपणे करून सर्वच राजकीय मुत्सद्यांना धोबीपछाड दिली आहे. याचा दुसरा अर्थ असा आहे की मतदान पैशाने प्रभावित झालेले नाही. निवडणुकीत पैशाचा आणि दारूचा महापूर आला होता हे खरे; पण त्यामुळे मतदान प्रभावित झाले असे मानणे सुज्ञ मतदारांचा अवमान आहे. दारू आणि पैशाने मतदान प्रभावित झाले असते तर मतदाराच्या निर्णयात दिसणारी एकसूत्रता आणि एक दिशा दिसली नसती. शहरी आणि ग्रामीण भागातील मतदाराच्या निर्णयात एकसूत्रता असण्याचे दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे दोन्ही भागातील उत्पादक शक्तींचा प्रामुख्याने असलेला मतदानातील सहभाग आणि उत्साह आहे. सरकारी किंवा निमसरकारी निर्णयाचा परिणाम आणि फटका ज्या वर्गांना बसतो त्या वर्गाचा मतदानात मोठा आणि महत्त्वाचा सहभाग असल्याने मतदारांनी व्यावहारिक निर्णय घेतला आहे. मतदारांचा निर्णय आदर्श सदरात मोडत नाही कारण त्याच्या समोर आदर्श पर्याय नाहीत; पण आदर्श पर्याय नाहीत म्हणून अतिशिक्षित, श्रीमंत आणि सुस्थितीत असलेल्या मतदारासारखे मतदान न करण्याचे लोकशाही द्रोही वर्तन सर्वसामान्य मतदारांनी केले नाही ही अभिमानाची बाब मानली पाहिजे. भद्रलोकांच्या लोकशाही द्रोहीवर्तनाबद्दल आणि या वर्तनाला वेसण घालण्याच्या उपायाबद्दल स्वतंत्रपणे दुसऱ्या लेखात विचार करू. या लेखात निवडणुकीनंतर निर्माण झालेल्या राजकीय परिस्थितीचा विचार करू.

नवा सितारा आणि तारा

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या निवडणुकीने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि त्या पक्षात उपमुख्यमंत्री अजित पवार यांना बळ दिले असले तरी हे निवडणुकीच्या रिंगणातील तरबेज खेळाडू आहे. त्यांनी इतरावर मात करण्यात काहीच नावीन्य नाही. उलट त्यांना असे यश मिळाले नसते तर तो चर्चे चा विषय राहिला असता. या विजयाचे काहीसे श्रेय राष्ट्रवादीच्या साधन संपन्नतेला जात असले तरी पक्षाचा नेता म्हणून अजित पवारांनी दाखविलेली आक्रमकता आणि कार्यकर्त्यांना कार्यप्रवण करण्याची त्यांची ताकद आणि जोडीला काम करणारा नेता अशी उभी करण्यात आलेली त्यांची प्रतिमा याला या विजयाचे अधिक श्रेय द्यावे लागेल. नेमके असेच गुण आणि अशीच प्रतिमा राज ठाकरे यांची असल्याने त्यांना स्वत:ला अपेक्षित असलेले यश मिळाले नसले तरी डोळ्यात भरण्याजोगे यश नक्कीच मिळाले आहे. राज ठाकरे हे माध्यमांत प्रिय म्हणण्यापेक्षा माध्यमावर दरारा ठेवणारे व्यक्तिमत्व असल्याने त्यांच्या यशात माध्यमांचा वाटा नाकारणे हे माध्यमांच्या भित्रेपणाला नाकारण्यासारखे होईल! माध्यमांनी जसे अण्णा हजारे यांची प्रतिगांधी म्हणून लोकांमध्ये प्रतिमा निर्माण करण्याचा प्रयत्न केला

तसाच प्रति शिवसेना प्रमुख म्हणून राज ठाकरे यांची प्रतिमा लोकांसमोर उभी करण्यात कोणतीच कसर ठेवली नाही. अन्यथा कोणतेही राजकीय तत्वज्ञान नसणारी आणि कोणताही आर्थिक, राजकीय किंवा सामाजिक कार्यक्रम नसणारी नवी संघटना सशक्त राजकीय पक्ष म्हणून समोर येणे कठीण होते. राजकीय तत्वज्ञान आणि पक्ष बांधणी नसताना एक शक्ती म्हणून मनसे पुढे येण्याचे दुसरे महत्वाचे कारण म्हणजे राज ठाकरे यांनी कायदा हाती घेण्याची वा मनात येईल तेव्हा कायदा मोडण्याची उचललेली शिवसेना शैली हे आहे. राज यांची नकलाकार म्हणून ख्याती आहे. शिवसेना प्रमुखाची हुबेहूब नक्कल करण्यात ते पारंगत आहेत. त्यांच्या लोकप्रिय भाषण शैलीचे हेच खरे भांडवल आहे. पण मनसे चे सामर्थ्य या नकलेत दडलेले नाही. कायदा हाती घेण्याची आणि कायदा मोडण्याची शिवसेनेची नक्कल हेच त्यांचे सामर्थ्य आहे. नकलेतील अक्कल हुशारी ही आहे. नक्कल करायला अक्कल लागते हा सार्थ अभिमान राज यांना वाटतो ते या नकलेतून उभा राहिलेल्या सामर्थ्याने! कायदा हाती घेण्याच्या जुन्या शिवसेना शैलीचे राज स्व बळावर पुनरुज्जीवन करू शकले असे मानणे मात्र भाबडे पणाचे ठरेल. या पुनरुज्जीवनाला बळ आणि अभय आबा पाटलांच्या मुंबई पोलिसांनी दिले शिवसेनेच्या खच्चीकरनासाठी काँग्रेस-राष्ट्रवादीच्या राज्यकर्त्यांनी कायदा मोडण्याचे राज उद्योग चालू देण्यात पोलीस अडथळा आणणार नाहीत याची पुरेपूर काळजी घेतली हे विसरून चालणार नाही. राज मनात येईल ते करू शकतात हा दबदबा आणि प्रतिमा निर्मितीचे श्रेय राज्य सरकार आणि माध्यमे यांना संयुक्तपणे जाते ते याच मुळे. या प्रतिमेचे बळ आणि फळ या निवडणुकीत राज यांना लाभून राज व त्यांची मनसे नवा सितारा म्हणून पुढे आले आहेत. एखाद्या सीताऱ्या जवळ जो तामझाम असतो तो राज जवळ असल्याने साहजिकच सगळा प्रकाश झोत आपल्यावर खेचण्यात राज यशस्वी झाले आहे. असे असले तरी या निवडणुकांच्या परिणामी खऱ्या अर्थाने यशस्वी तारा म्हणून उद्धव ठाकरे यांचा महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर उदय झाला हे मान्य करावे लागेल . पण माध्यमे एखाद्या व्यक्तीत ग्लैमर निर्माण करून त्या द्वारे आपला दर्शक वा वाचक वाढविण्याच्या खेळ खेळत असल्याने या उदयमान ताऱ्याकडे लक्ष द्यायला त्यांना वेळ नसावा. या निवडणुकीत उद्धव ठाकरे यांचे नेतृत्व तावून सलाखून दमदार बनले आहे इकडे माध्यमांनी दुर्लक्ष केले आहे. शिवसेना प्रमुखाचा वारसा उद्धव नाही तर राज चालवू शकतात हीच महाराष्ट्रातील आणि माध्यमातील सार्वत्रिक चर्चा व विश्वास होता. गेल्या विधानसभा निवडणूक निकालाने या चर्चे ला बळ मिळाले होते. राज पुढे येण्याचे वातावरण या चर्चेतून तयार झाले होते. पुत्रप्रेमापोटी शिवसेना प्रमुखाने चुकीचा वारस निवडला असा ठपका देखील शिवसेना प्रमुखावर ठेवला गेला होता. मात्र या निवडणूक निकालाने प्रथमच शिवसेना प्रमुखाचा निर्णय चुकीचा नव्हता हे सिद्ध केले आहे. उद्धव यांच्यात नक्कल करण्याची अक्कल नसणे हेच उद्धवच्या आणि शिवसेनेच्या पथ्यावर पडलेले दिसते. शिवसेनेला राडा संस्कृतीतून बाहेर काढून खऱ्या अर्थाने लोकांच्या समस्या जाणणारा व सोडवणारा गंभीर राजकीय पक्ष बनविण्याच्या इराद्याने शिवसेना प्रमुखांनी राज ऐवजी उद्धव यांना वारस निवडला असावा . कारण राज यांनी मनसे ज्या पद्धतीने उभी केली आणि चालविली तो प्रकार शिवसेनेचा भूतकाळ पुनरुज्जीवित करणारा आहे. त्यानंतर पुलावरून बरेच पाणी वाहून गेले आहे. त्यामुळे आपली नक्कल करणारे नेतृत्व नको तर आपल्याही पुढे शिवसेनेला घेवून जाणारे नेतृत्व हवे असा विचार शिवसेना प्रमुखांनी केला असेल तर तो चुकीचा म्हणता येणार नाही. शिवसेना प्रमुखाने काय विचार केला या संबंधीचे तर्क बाजूला ठेवले तरी दलित विरोधी , पर प्रांतीय पर धर्मीय अशा द्वेषाच्या पायावर उभ्या असलेल्या शिवसेनेला उद्धवने सामंजस्याचा मंत्र देवून शिवसेनेला नवे रूप देण्याचा प्रयत्न केला हे मानावे लागेल. राडा संस्कृती अंगात भिनलेल्या शिवसेनेला प्रारंभी उद्धवचा सुसंस्कृत प्रयत्न न भावल्याने प्रारंभी शिवसेनेची पिछेहाट झाली. पण अशी पिछेहाट झाली म्हणून घाबरून व बावरून न जाता आणि माघारी न वळता शिवसेनेला व्यापक पायावर उभा करण्याचा प्रयत्न पुढे नेण्याची चिकाटी , जिद्द आणि धाडस उद्धवने दाखविले आणि बाळासाहेबांची निवड चुकली नसल्याचे दाखवून दिले आहे. शिवसेनेला पूर्वीही ग्रामीण आधार होता. पण त्या आधाराचा पाया मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतरातून तयार झालेला सवर्णांचा दलित द्वेष होता. उद्धवने दलित द्वेषा ऐवजी शेतकऱ्यांच्या प्रश्नाशी शिवसेनेची नाळ जोडण्याचा प्रयत्न केला. शेतीत सर्वस्व गमावून मुंबईत दाखल होणारे शेतकऱ्यांचे लोंढे शिवसेनेला फायदेशीर ठरले असण्याची शक्यता म्हणूनच नाकारता येत नाही. राज चे लक्ष आणि लक्ष्य उत्तरेतील लोंढ्याकडे राहिले आहे ,पण उद्धव मुंबई बाहेर जास्त फिरल्याने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे लोंढे मुंबईत येतात याची जाण आल्याने बाहेरील लोंढ्या बाबत उद्धवची भूमिका सौम्य झाली आणि ती शिवसेनेला फायदेशीर राहिली याचे अनुमान मुंबईच्या निवडणूक निकाला वरून काढता येते. उद्धवची समजच नाही तर आत्मविश्वासही वाढल्याचे ताजा घटनाक्रम दर्शवितो. राज आणि उद्धव यांनी एकत्र यावे हे सेना प्रमुखांचे उदगार मुंबई पालिकेच्या निवडणुकीत त्यांचाही आत्म विश्वास डळमळीत झाल्याचे दर्शवितात. पण त्या परिस्थितीतही उद्धवने एकत्र येण्यास ठाम नकार देवून आपल्यातील आत्मविश्वासाचे दर्शन घडविले. विधानसभा निवडणुकीत भाजपच्या मागे पडण्याची नामुष्की पदरी पडलेल्या शिवसेनेला या निवडणुकीत उद्धवने पुन्हा भाजप च्या पुढे नेले आहे. महानगर पालिकेच्या निवडणुकीतील यशाचे मोठे श्रेय शिवसेना प्रमुखाकडे जात असले तरी जि.प.-पंचायत समितीतील शिवसेनेचे यश निखळ उद्धवचे आहे हे मान्य करावे लागेल. पण भारतातील हे यश इंडियाची माध्यमे मोजायलाच तयार नाहीत! उद्धवच्या नेतृत्वाखाली शिवसेना लगेच धर्म निरपेक्ष होईल आणि जात , प्रांत याचा भेदभाव न मानता आर्थिक प्रश्नावर लक्ष केंद्रित करील असे मानने भाबडेपणाचे होईल. पण त्या दिशेने शिवसेनेला एक पाऊल पुढे नेण्याची ताकद या निवडणुकीने उद्धवला दिली आहे. या दिशेने पुढे जाण्याशिवाय उद्धव समोर पर्यायही नाही. उद्धवने शिवसेनेला परत पूर्वीच्या वळणावर न्यायचे ठरविले तर मात्र शिवसेनेला उद्धवच्या नाही तर राज च्या नेतृत्वाची गरज भासेल ! शिवसेनेला अशा निर्णायक वळणावर या निवडणुकीने आणून सोडले आहे हेच या निवडणूक निकालाचे वैशिष्ठ्य आहे. या निवडणुकीने राज आणि उद्धव हे दोन नव्या दमाचे नेते महाराष्ट्राला दिले असले तरी काँग्रेस आणि भाजप या जुन्या पक्षांमध्ये मात्र नेतृत्वाचे मोठे संकट असल्याची जाणीवही करून दिली आहे. या संकटावर मात केल्या शिवाय पुढच्या निवडणुका जिंकणे कठीण असल्याचा इशारा मतदारांनी या पक्षांच्या जुन्या खोडांना दिला आहे. अण्णा आंदोलनाची पार्श्वभूमी लाभलेल्या या निवडणुकीमध्ये अण्णांच्या निशाण्यावर नंबर एकवर असलेल्या शरद पवारांच्या पक्षाला पंचायत समिती ,जिल्हा परिषद,नगर पालिका आणि महानगर पालिका या सर्व स्तरावर नंबर एक चा पक्ष म्हणून जनतेने शिक्का मोर्तब केले आहे तर महानगराधारित अण्णा आंदोलनाचा मुखर आणि प्रखर विरोध करणाऱ्या शिवसेनेचा झेंडा मुंबई-ठाणे सारख्या महानगरावर डौलाने फडकणार आहे! अण्णा आंदोलनालाही मंथन आणि चिंतन करण्यास महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीने बाध्य केले आहे. मतदारांनी विचारपूर्वक मतदान करून सर्वांनाच विचार करायला भाग पाडले हीच मतदारांच्या परिपक्वतेची निशाणी आहे.

**सुधाकर जाधव**
पांढरकवडा, जि.यवतमाळ मो. ९४२२१६८१५८
ssudhakarjadhav@gmail.com
http://myblog-common-nonsense.blogspot.com/

■■

# तांदळावरील राज्यबंदी आंध्रातील शेतकऱ्यांनी झुगारली



**येसगी (प्रतिनिधी):** आंध्रप्रदेशातील एक हजारपेक्षा जास्त शेतकऱ्यांनी बाजार विरोधी कायदा तोडून बाजारपेठेचे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी महाराष्ट्राच्या हद्दीत प्रवेश केला. आंध्रप्रदेशातील शेतकरी वांजरा नदी ओलांडून आंध्रप्रदेश सीमेच्या बाहेर येसगीच्या पूलावरून बैलगाड्या व अन्य वाहनांसोबत महाराष्ट्रात प्रवेश केला. महाराष्ट्र शेतकरी संघटनेतर्फे गुणवंत पाटील हंगरगेकर यांनी आंध्रप्रदेशच्या शेतकऱ्यांचे नेतृत्व करीत असलेले आमदार डॉ. जयप्रकाश नारायण यांचे स्वागत केले. स्वागतानंतर येसगी या ग्रामस्थानी सर्व शेतकरी रॅलीचे रुपांतर सभेत झाले. या सभेची प्रस्तावना भीमराव पाटील यांनी केली. गुणवंत पाटील हंगरगेकर व डॉ. आम. जयप्रकाश नारायण यांनी चळवळीचे झेंडे एक-दुसऱ्यांना देऊन स्वागत केले. डोक्यावर व बैलगाडीमध्ये आणलेल्या तांदळाची खरेदी शेतकरी संघटना व महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी केली. आंध्रप्रदेशात पूर्व गोदावरी व प. गोदावरी या जिल्ह्यांनी खरीप पीकाची सुटी जाहीर करूनही इतर जिल्ह्यांत तांदळाचे उत्पादन अतोनात झाले आहे. आंध्रप्रदेश सरकारने बाहेर राज्यात तांदूळ घेऊन जाण्यास बंदी केली आहे. ही बंदी तोडण्यासाठी दि. २६ फेब्रुवारी २०१२ रोजी दुपारी ठीक १ वाजता सीमा उल्लंघन केले. आंध्रातील शेतकऱ्यांनी हिंमत दाखवून महाराष्ट्रात तांदूळ घेऊन आल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. एक लाख रु. तांदूळ खरेदीची हमीही दिली. यावेळी आंध्र प्रदेशातील लोकसत्ता पार्टीचे अध्यक्ष डॉ. जयप्रकाश नारायण, एम.अप्पी रेड्डी, शेतकरी नेते नागेंद्रनाथ, जिल्हाध्यक्ष लता निझामबादकर व गुणवंत पाटील हंगरगेकर यांची भाषणे झाली. महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते भीमराव पाटील हसमाळीकर, शिवराज पाटील थडीसावळीकर, व्यंकटराव वडजे, बाबू पाटील, अशोक पाटील, निळकंठ, विठ्ठल रेड्डी व यसेगीचे माजी सरपंच गंगाधर प्रचंड आदी मान्यवर मंडळी हजर होती.

# आता परभणी जिल्ह्यातील शेतकरीही करणार गांजाची लागवड

**परभणी :** शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य भाव मिळत नसल्यामुळे राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र सुरू आहे. शेतकऱ्याने कोणता बँक घोटाळा केला नाही किंवा कोणाला आमीष दाखवून फसविले नाही. पीक परवडत नाही म्हणून बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी अफू-गांजाची लागवड केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे, हे प्रकरण गाजत असतानाच जिल्ह्यातही शेतकरी संघटनेच्या वतीने निवेदन प्रसिद्धीस देऊन गांजाची शेती करण्याचा इशारा दिला आहे.

शेतकरी संघटनेच्या निवेदनामुळे खळबळ उडाली आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर शेतकरी संघटनेने वारंवार आंदोलने केली. जवळपास ३० वर्षांपूर्वी शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव द्या अशी मागणी केली होती. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीमालाच्या भावाचा प्रश्न सुटणार होता; परंतु शासनाला शेतकऱ्याचे नाव फक्त निवडणुका आल्यावरच घेता येते. शासनाने या महत्त्वाच्या मागणीकडे नेहमीच दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे शेतकरी देशोधडीस लागला आहे आणि त्यामुळेच शेतकरी मोठ्या प्रमाणात आत्महत्या करत आहेत. कापसाचा भाव ७ हजारांहून ३ हजार ५०० वर येत आहे. तुरीचा भाव ६ हजाराहून २ हजार पाचशेवर आला आहे, तर हळदीचा भाव २५ हजाराहून फक्त ३ हजारावर येऊन ठेपला आहे, असे नेहमीच प्रत्येक शेती मालाच्या बाबतीत घडत आहे. त्यामुळे शेतकरी जगणार तरी कसा? असा प्रश्न या निवेदनात उपस्थित करून कापसाचा भाव जर ७ हजारावर गेला तर शासन निर्यातबंदी आणते; पण कापसाचा भाव बेभाव झाला तर शासन शेतकऱ्याकडे ढुंकूनही पाहत नाही. शासनाने शेतकऱ्याला अक्षरशः वाऱ्यावर सोडले असल्याचा आरोप केला आहे. शासनाच्या या शेतकरी विरोधी धोरणाला कंटाळून आंध्र प्रदेशातील शेतकऱ्यांनी आपली लाखो एकर जमीन पडीत ठेवली आहे. कृषिमूल्य आयोगाचे अध्यक्ष डॉ. अशोक गुलाटी यांनी तर शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव देणे अशक्य आहे, असे जाहीर केले. यावर देशाचे राजकारण तर सोडाच; परंतु कृषिप्रधान देशातील विचारवंतही कसे गप्प बसून आहेत? जगातील कोणताही उत्पादक त्याच्या कारखान्यात तयार झालेल्या वस्तूला शंभर रुपये खर्च आला असेल तर ती वस्तू कमीत कमी ११० रुपयांना विकतो. त्यापेक्षा कमी विकणे त्याला शक्य होत नाही; परंतु शेतकऱ्याच्या शेतीमालाला पिकविण्यास शंभर रुपये लागले असतील तर नफा तर सोडाच किमान शंभर रुपये तरी द्या अशी रास्त मागणी शेतकरी संघटनेने केली असून परळी तालुक्यात गांजाची शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे समर्थन करीत शेतकऱ्यांनी कोणता बँक घोटाळा केला नाही किंवा कोणाला खोटे आमीष दाखवून फसविले नाही. त्यांनी फक्त कोणतेही पीक परवडत नाही म्हणून अफुची शेती केली असल्याचे या निवेदनात नमूद केले आहे. याच शेतकऱ्यांच्या पावलावर पाऊल ठेवून आता संपूर्ण परभणी जिल्ह्यात अफू व गांजाची लागवड करण्याचा निर्धार शेतकरी संघटनेने केला आहे. रविवार २६ फेब्रुवारी रोजी घेण्यात आलेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती या निवेदनाद्वारे दिली आहे. निवेदनावर संघटनेचे माजी जिल्हा संघटक रंगनाथ चोपडे, भगवान शिंदे, अनंत पवार, भास्कर खटींग, राजाभाऊ गोरे, वसंत हरकळ, गोपाळ लोंढे, गणेश पवार आदींसह शेकडो शेतकरी उपस्थित होते.

(दै. देशोन्नती दि. २७ फेब्रुवारी मधून सभार)

शेतकरी
महिला आघाडी

# संयुक्त कार्यकारिणीची बैठक

**प्रिय मित्र/भगिनी**
**स. न. वि. वि.**

शेतकरी संघटना आणि स्वतंत्र भारत पक्ष यांची संयुक्त कार्यकारिणी बैठक दि. १० व ११ मार्च २०१२ रोजी जालना येथे आयोजित करण्यात आली असून या बैठकीची विषयपत्रिका पुढीलप्रमाणे असेल.

**विषयपत्रिका :**

१. कर्जमुक्ती आंदोलन टप्पा क्र. ३ ला अंतिम स्वरूप देणे. (भरलेले सर्व फॉर्मस् बरोबर घेऊन येणे.)

२. प्रतिविधानसभा २ मुंबई येथे अंदाजपत्रकीय अधिवेशन भरवून समांतर चर्चा घडवून आणण्यासाठी तयारी, नियोजन व आर्थिक तरतूद करणे.

३. किरकोळ, बाजारपेठेत थेट परकीय गुंतवणुकीला (एफडीआय) मान्यता द्यावी म्हणून राज्य सरकारवर दबाव आणण्यासाठी मुंबई येथे राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मोर्चाचे आयोजन करणे.

४. शेतकऱ्यांना मालमत्तेचा मूलभूत अधिकार प्राप्त व्हावा म्हणून राज्यघटनेच्या अनुच्छेद (९) संदर्भात कार्यक्रम आखणे.

४ अ) होळी पौर्णिमेच्या दिवशी अनुच्छेद (९) च्या प्रतीचे दहन करणे.

५. देशाच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय परिस्थितीचे विश्लेषण करून स्वतंत्र भारत पक्षाच्या नियोजित मतदारसंघात जाहीर सभा आयोजित करणे. निवडणूक पद्धतीत सुधारणा हा या जाहीर सभेचा महत्त्वाचा विषय असेल.

६. आयत्या वेळी येणाऱ्या विषयांवर अध्यक्षांच्या परवानगीने चर्चा करण्यात येईल.

**दिनांक १० व ११ मार्च २०१२**

**बैठकीचे ठिकाण : शकुंतलादेवी मंगल कार्यालय, देहडकरवाडी, जालना.**

बैठक १० मार्च रोजी सकाळी ठीक १० वाजता सुरू होऊन ११ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत चालेल.

१० मार्च रोजी दुपारी १२ ते सायंकाळी ५ या वेळेत
**ॲडल्ट एज्युकेशन इन्स्टिट्यूट, मुंबई व प्रोजेक्ट फॉर इकॉनॉमिक एज्युकेशन आणि शेतकरी संघटना**
**यांच्या संयुक्त विद्यमाने** बैठकीच्या ठिकाणीच

## लोकशाहीचे विकेंद्रीकरण

या विषयावर चर्चासत्र होणार असून त्यात
**स्वभापचे राष्ट्रीय अध्यक्ष खा. श्री. शरद जोशी, राजाजींच्या स्वतंत्र पक्षाचे सरचिटणीस श्री. एस.व्ही. राजू, स्वभापचे खजिनदार श्री. संजय पानसे, श्री. विनय हर्डीकर इत्यादी मार्गदर्शन करतील.**

**आपण या महत्त्वाच्या बैठकीस आणि चर्चासत्रास अवश्य हजर राहावे ही विनंती.**

विनित,

**वामनराव चटप**
अध्यक्ष, स्वभाप (महाराष्ट्र)

**सौ सरोज काशीकर,**
अध्यक्ष, स्वभाप महिला आघाडी

**ॲड. दिनेश शर्मा**
अध्यक्ष, स्वभाप युवा आघाडी

**रवि देवांग**
अध्यक्ष, शेतकरी संघटना

**सौ. शैलजा देशपांडे**
अध्यक्ष, शेतकरी महिला आघाडी

**श्री. संजय कोले**
अध्यक्ष, शेतकरी युवा आघाडी

**सूचना :** १. निवास व भोजनाची व्यवस्था बैठकीच्या ठिकाणी करण्यात आली आहे.
२. ९ मार्च रोजी रात्री येणाऱ्या सदस्यांची निवासाची व्यवस्था बैठकीच्या ठिकाणी करण्यात येईल.
३. संपर्क - श्री. बाबूराव गोल्डे, जालना जिल्हा अध्यक्ष मो. ९४२३५४०२४६